सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २८६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १८ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# 'राम-जी' विधेयक लोकसभेत मंजूर विरोधकांचा सभागृहात राडा

## मंत्री शिवराजसिंह चौहानांच्या अंगावर फेकले कागद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नवी दिल्ली**

देशातील ग्रामीण जनतेला दोन दशके रोजगाराची हमी देणाऱ्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचं नाव आणि स्वरूप बदलणारं 'व्हीबी-जी राम-जी' विधेयक लोकसभेत मंजूर झालं आहे. विरोधी पक्षांनी या विधेयकाला सभागृहात कडाडून विरोध केला. विरोधी खासदारांच्या गोंधळादरम्यान सरकारने हे विधेयक पारित केलं आहे. यावेळी निषेध म्हणून विरोधकांनी केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या अंगावर कागद फेकले. गेल्या काही दिवसांपासून या विधेयकावरून वाद होत आहे.




नव्या रोजगार हमी योजनेतून 'महात्मा गांधी' हे नाव वगळण्यात आलं असून या योजनेचं 'विकसित भारत गॅरंटी फॉर रोजगार अँड अजीविका मिशन' (व्हीबी-जी-राम-जी) असं नामांतर करण्यात आलं आहे. विरोधकांनी आरोप केला आहे की सरकार जाणीवपूर्वक महात्मा गांधींचं नाव हटवू पाहतंय. दुसऱ्या बाजूला सत्ताधाऱ्यांनी याबाबत म्हटलं आहे की विकसित भारताची आपली योजना डोळ्यासमोर ठेवून आम्ही योजनेत बदल करत आहोत.

**बापू आमच्यासाठी आदर्श शिवराज सिंह चौहान**

शिवराज सिंह चौहान म्हणाले, विरोधी पक्ष बापूंच्या (महात्मा गांधी) विचारांचा खून करत आहे. काल सभागृहात मी मध्यरात्री दिड वाजेपर्यंत सर्व सदस्यांची मतं ऐकली. मात्र, आता ते आमचं काही ऐकूनच घेत नाहीत. केवळ आपण बोलायचं, समोरच्या बाकावरील खासदारांचं काही ऐकूनच घ्यायचं नाही ही देखील एक प्रकारची हिंसा आहे. बापू आमच्यासाठी आदर्श आहेत. ते आम्हाला प्रेरणा देतात. आम्ही महात्मा गांधींच्या विचारांवर चालत आहोत. म्हणूनच भारतीय जनता पार्टीने आपल्या पंचनिष्ठेमध्ये महात्मा गांधीजींच्या समाजिक, आर्थिक विचारांना सर्वप्रथम स्थान दिलं आहे.

हा देश आमच्यासाठी केवळ जमिनीचा एक तुकडा नाही. हा देश आमच्यासाठी एक जीवंत राष्ट्रपुरुष आहे. आम्ही या देशासाठी जगतो आणि या देशासाठी मरण पत्करण्याची वेळ आली तर आम्ही ते देखील आनंदाने स्वीकारू.


केंद्रीय कृषीमंत्री म्हणाले, मनरेगाऐवजी केंद्र सरकारच्या व्हीबी-जी राम जी /श योजनेचं प्रमुख उद्दीष्ट म्हणजे विकसित भारत २०४७ या पंतप्रधान मोदींच्या संकल्पाला हातभार लावणे. मोदींच्या राष्ट्रीय व्हिजनला अनुरूप असा ग्रामीण विकासाचा पाया रचणं हे या योजनेचं उद्दीष्ट आहे. मागील २० वर्षांमध्ये मनरेगाने ग्रामीण कुटुंबांना रोजगार दिला. परंतु, गावांमध्ये अलीकडच्या काळात अनेक सामाजिक व आर्थिक बदल झाले आहे. त्या आधारावर आता ही योजना अधिक व्यापक व मजबूत करणं आवश्यक आहे. आम्ही नेमकं तेच करत आहोत.

# महायुतीच्या मुंबई 'फॉर्म्युला'तून राष्ट्रवादी आउट

## भाजप-शिवसेनेचे १५० जागांवर एकमत; ७७ जागांसाठी खलबतं सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

मुंबई महापालिकेच्या सत्तेसाठी महायुतीने आपली कंबर कसली आहे. महायुतीमधील प्रमुख घटक पक्ष असलेल्या भाजप आणि शिवसेनेमध्ये (शिंदे गट) २२७ पैकी तब्बल १५० जागांवर एकमत झाले आहे. मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम आणि शिवसेना नेते उदय सामंत यांनी एका संयुक्त पत्रकार परिषदेत ही महत्त्वाची घोषणा केली. महत्त्वाचे म्हणजे, या जागावाटपात सध्यातरी राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) स्थान देण्यात आलेले नाही, ज्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.



पत्रकार परिषदेत बोलताना अमित साटम यांनी ठाकरे बंधूंवर सडकून टीका केली. मुंबईचा रंग बदलण्याचा आणि मुंबईकरांच्या अस्मितेशी खेळणाऱ्यांचा या निवडणुकीत पराभव करायचा आहे, असे म्हणत त्यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांना थेट आव्हान दिले. मुंबईच्या विकासासाठी आणि भ्रष्टाचाराचा विळखा तोडण्यासाठी भाजप-शिवसेना एकत्र लढणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. तर निकाल १६ जानेवारीला लागणार आहे.

मुंबई महापालिकेच्या २२७ वॉर्डांपैकी १५० जागांवर भाजप-शिवसेनेचे एकमत झालं आहे. उर्वरित ७७ जागांवर पुढच्या दोन दिवसांत चर्चा करुन घोषणा केली जाणार आहे. मुंबई महापालिकेला भ्रष्टाचार विरहित प्रशासन द्यायचं आहे. ही मुंबईकरांची इच्छा आहे. त्यामुळे १५० पेक्षा जास्त जागा जिंकून मुंबईकरांचा महापौर होईल. काही लोक आपल्या मतांच्या लांगुलचालनासाठी मुंबई शहराचा रंग बदलण्याचा प्रयत्न करत आहेत. तो प्रयत्न हाणून पाडण्यावर आमचं एकमत आहे. ज्या लोकांनी मुंबईत पालिकेत २५ वर्षे भ्रष्टाचार करुन मुंबई विकून खाल्ली आणि आता स्वतःचे राजकीय अस्तित्व जिवंत करण्याकरता मुंबई शहराचा रंग बदलण्याचा प्रयत्न ते करत आहेत, असं मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम म्हणाले.

# उद्धव ठाकरेंची शिवसेना १२५ तर राज ठाकरेंची मनसे १० जागांवर लढण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

मुंबई महानगरपालिकेच्या आगामी १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी 'शिवसेना आणि 'महाराष्ट्र नवनिर्माण सेना' यांच्यात ऐतिहासिक युती होण्याचे संकेत मिळत आहेत. दोन्ही पक्षांमध्ये जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात असून, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना १२५ जागांवर, तर राज ठाकरे यांची मनसे ९० जागांवर निवडणूक लढवण्याची दाट शक्यता आहे.




ज्या प्रभागांमध्ये मराठी मतदारांचे वर्चस्व आहे, तिथे ५०-५० टक्क्यांचा फॉर्म्युला राबवला जाणार आहे. तर उर्वरित प्रभागांमध्ये ६०-४० किंवा ताकदीनुसार जागांची विभागणी केली जाईल. विशेष म्हणजे, मुस्लिम बहुल भागांत उद्धव ठाकरे यांची शिवसेना आपले उमेदवार उभे करेल, असेही समजते.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या युतीची अधिकृत घोषणा २३ डिसेंबर २०२५ रोजी होण्याची शक्यता आहे. या दिवशी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकाच मंचावर येऊन मुंबईच्या मतदारांना साद घालू शकतात. गेल्या दोन दशकांपासून स्वतंत्र राजकारण करणाऱ्या या दोन भावांनी 'मुंबई' आणि 'मराठी अस्मिता' वाचवण्यासाठी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. उद्धव शिवसेनेकडे गेल्यावेळी जिंकलेल्या ८४ जागा आहेत. त्या सर्व आपल्याकडेच रहाव्यात अशी मागणी त्यांची आहे. परंतू, मनसे देखील काही मतदारसंघात मजबूत आहे, यामुळे मनसे या ऑफरवर तयार नाहीय. यामुळे या भागातील मतदारसंघ वाटले जाणार आहेत. शिवाय काँग्रेस येणार नसली तरी शरद पवार राष्ट्रवादी सोबत आली तर त्यांच्यासाठी १०-१५ जागा सोडाव्या लागणार आहेत.

# माणिकराव कोकाटेंना अटक करण्यासाठी नाशिक पोलिस मुंबईला रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नाशिक**

नाशिकमधील सदनिका घोटाळा प्रकरणी नाशिकच्या जिल्हा सत्र न्यायालयाने क्रीडा आणि अल्पसंख्याक विकास मंत्री माणिकराव कोकाटे यांना दोषी ठरवून दोन वर्षांची शिक्षा सुनावली आणि त्यांचा अटक वॉरंट देखील जारी करण्यात आला आहे. मात्र त्यांच्या वकिलाच्या वतीने न्यायालयाला कोकाटे यांची प्रकृती बिघडलेली असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र न्यायालयाने त्यांना फटकारत रुग्णालयात भरती झाल्याबाबतचे अधिकृत लेखी पुरावे सादर करावे असे सांगितले. माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात न्यायालयाने दिलेल्या नॉन-बेलेबल अटक वॉरंटची अंमलबजावणी करण्यासाठी नाशिक पोलिसांची विशेष टीम थोड्याच वेळात मुंबईकडे रवाना होणार आहे.



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सध्या कोकाटे हे मुंबईतील लीलावती हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असल्याची माहिती असून तेथे जाऊन अटक वॉरंट बजावण्याची तयारी पोलिसांनी केली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई करत नाशिक पोलिस लीलावती हॉस्पिटलमध्ये जाऊन माणिकराव कोकाटे यांना अटक वॉरंट बजावणार आहेत. या कारवाईमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# नवाब मलिक यांचे नेतृत्व असलेल्या राष्ट्रवादीबरोबर आमचे देणे-घेणे नाही; भाजपाची भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते आणि राज्याचे मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट निघाल्याप्रकरणी त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. त्यांच्या अटकेबाबतची सुनावणी शुक्रवारी उच्च न्यायालयात होणार आहे. तोपर्यंत त्यांच्या मंत्रिपदाला अभय मिळाले आहे. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कोकाटे यांच्या राजीनाम्यावर ठाम असल्याची माहिती माध्यमांच्या हवाल्याने मिळत आहे. कोकाटे यांना राजीनामा द्यावा लागल्यास महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला हा दुसरा धक्का असेल. याआधी धनंजय मुंडे यांनाही मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता.



दुसरीकडे काँग्रेसच्या नेत्या आणि विधानपरिषदेच्या आमदार प्रज्ञा सातव यांनी आपल्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याची माहिती मिळत आहे. लवकरच त्या भाजपामध्ये प्रवेश करणार आहेत. काँग्रेसमध्ये त्या गेल्या काही काळापासून नाराज असल्याचे वृत्त आहे.

# भाजपचा डाव काँग्रेसच्या जिव्हारी २ माजी आमदारांनी घेतले कमळ

## शेकडो समर्थकांनी सोडली साथ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

ऐन महापालिका निवडणुकीमध्ये भाजपने काँग्रेसला जोरदार धक्का दिलाय. हिंगोली अन् सोलापूरमधील दिग्गज नेत्यांनी काँग्रेसची साथ सोडली. हिंगोलीमधील काँग्रेसच्या आमदार प्रज्ञा सातव आणि सोलापूरमधील माजी आमदार दिलीप माने यांनी भाजपमध्ये आज प्रवेश केला. त्यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह गुरुवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले.




प्रज्ञा सातव यांच्यासह पक्षप्रवेश केलेल्यांमध्ये हिंगोली येथील काँग्रेसचे जिल्हा परिषद माजी सदस्य शिवाजीराव मस्के, जिल्हा प्रवक्ता तथा उपाध्यक्ष विलास गोरे, कळमनुरीचे तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा औंढा नागनाथ चे तालुकाध्यक्ष पंकज जाधव, खेर्डा गावचे सरपंच पंजाबराव गडदे, काँग्रेस चे जिल्हा उपाध्यक्ष नामदेवराव चव्हाण आदींचा समावेश आहे.

दिलीप माने यांच्याबरोबर भाजपात पक्ष प्रवेश केलेल्यांमध्ये सोलापूरचे माजी नगरसेवक जयकुमार माने, नागेश ताकमोगे, दादाराव ताकमोगे, बाजार समितीचे संचालक प्रथमेश पाटील, माने बँकेचे संचालक आनंद देटे, काँग्रेसचे युवा अध्यक्ष पृथ्वीराज माने आदींचा समावेश आहे.

या दोघांनी ज्या विश्वासाने भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे, त्या विश्वासाची बूज राखली जाईल. समस्यांची जाण असलेले उमदे व्यक्तिमत्व स्व. राजीव सातव आज आपल्यात नाहीत याबद्दल दुःख व्यक्त करत राजीव सातव यांचा समाजकार्याचा वारसा त्यांच्या पत्नी प्रज्ञा सातव पुढे नेत आहेत याचा सार्थ अभिमान असल्याचे चव्हाण म्हणाले.

# राज्यस्तरीय शालेय आर्चरी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

## आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी ५० लाखांचा निधी उपलब्ध करून देणार-जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

जिल्ह्यातील खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आर्चरी स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करतात. नैसर्गिक क्रीडा कौशल्य असूनही अत्याधुनिक साहित्याअभावी खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कमी पडतात. यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतील नाविण्यपूर्ण योजनेतून किमान १० ते १५ आंतरराष्ट्रीय खेळाडूंना ५० लाख रूपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर दिली. राज्यस्तरीय शालेय आर्चरी क्रीडा स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल येथील आंतरराष्ट्रीय आर्चरी रेंजवर दि. १७ ते २० डिसेंबर २०२५ या दरम्यान होत आहे. आज या स्पर्धेचे उद्घाटन पार पडले. यावेळी राज्य धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष ड. प्रशांत देशपांडे, सचिव प्रमोद चांदूरकर, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, अनिल इंगळे, आदी उपस्थित होते.श्री. येरेकर यांनी, प्रतिभा असलेल्या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय आणि ऑलिंपिक स्पर्धेकरीता आवश्यक असलेले साहित्य उपलबध झाल्यास जिल्ह्यातील खेळाडू यात सहभागी होण्यास मदत होईल. खेळाडूंनी सकारात्मक विचार करुन जीवनामध्ये यशाचे शिखर गाठावे, असे आवाहन केले. तसेच स्पर्धेचे रितसर उद्घाटन केले.



राज्यस्तरीय १७ व १९ वर्ष मुले आणि मुली शालेय आर्चरी क्रीडा स्पर्धेत सन २०२५-२६ मध्ये राज्यातील ८ ही विभाग आणि एका क्रीडा प्रबोधिनीतील ४८५ मुले व मुली खेळाडू, पंच, सामनाधिकारी, निवड समिती सदस्य व संघ व्यवस्थापक स्पर्धेत सहभागी झाले आहेत. या राज्यस्तरीय शालेय आर्चरी स्पर्धेचे मुले व मुली या वयोगटातील सर्व सामने जिल्हा क्रीडा संकुलातील खेलो इंडिया आंतरराष्ट्रीय आर्चरी रेंजवर सुरु झाले आहे. दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी धनुर्विद्या प्रकारामधील इंडियन राऊंडची स्पर्धा झाली. दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी कंपाऊंड राऊंड, दि. २० डिसेंबर २०२५ रोजी रिकर्व्ह राऊंडचे सामने होणार आहेत.

उद्घाटन कार्यक्रमात सुरवातीला जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांच्या हस्ते ध्वजारोहन व क्रीडा ज्योत प्रज्वलन करण्यात आले. जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी प्रास्ताविक केले. सेवानिवृत्त जिल्हा क्रीडा अधिकारी प्रदिप शेटीये यांनी सूत्रसंचालन केले. क्रीडा अधिकारी अनिल इंगळे यांनी आभार मानले.

# १५०० लोकसंख्येच्या गावात २७ हजार जन्मांची नोंद

## यवतमाळमध्ये 'बर्थ सर्टिफिकेट'चा महाघोटाळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८यवतमाळ**

यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी तालुक्यातील शेंदुरसनी या अवघ्या १५०० लोकसंख्या असलेल्या छोट्याशा गावात गेल्या तीन महिन्यांत तब्बल २७,३९७ जन्मांच्या नोंदी झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नागरी नोंदणी प्रणालीत झालेल्या या नोंदींमुळे आरोग्य प्रशासन हादरले असून, यामागे एक मोठे आंतरराष्ट्रीय किंवा आंतरराज्यीय सायबर गुन्हेगारीचे रॅकेट असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

शासकीय आदेशानुसार सध्या बेकायदेशीररीत्या उशिराने होणाऱ्या जन्म-मृत्यू नोंदींची पडताळणी मोहीम सुरू आहे. या मोहिमेदरम्यान आर्णी तालुक्यातील आरोग्य विभागाच्या विस्तार अधिकाऱ्यांना शेंदुरसनी ग्रामपंचायतीच्या सीआरएस सॉफ्टवेअरमध्ये सप्टेंबर ते नोव्हेंबर या तीन महिन्यांच्या कालावधीत २७,३९७ जन्म आणि ७ मृत्यूंच्या नोंदी आढळल्या. १५०० लोकसंख्या असलेल्या गावात इतक्या मोठ्या प्रमाणात जन्म होणे अशक्य असल्याने तातडीने चौकशी करण्यास सुरुवात झाली आहे.या प्रकरणाची तांत्रिक तपासणी केली असता अधिक धक्कादायक माहिती समोर आली. शेंदुरसनी ग्रामपंचायतीचा सीआरएस आयडी चक्क मुंबईशी मॅप असल्याचे आढळले. याचा अर्थ, यवतमाळच्या या ग्रामपंचायतीचा आयडी वापरून मुंबईतून किंवा अन्य ठिकाणाहून हे बोगस दाखले तयार केले जात होते.

**तपासणीत काय सापडले?**

गावात प्रत्यक्षात होणाऱ्या जन्मांच्या तुलनेत ही संख्या हजारो पटीने जास्त आहे. चौकशी समितीला आढळले की, या २७,३९७ नोंदींपैकी एकही नोंद शेंदुरसनी ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील नाही. पुणे येथील आरोग्य सेवा उपसंचालक आणि नवी दिल्लीतील अतिरिक्त निबंधक जनरल कार्यालयाने केलेल्या तांत्रिक विश्लेषणानुसार, हा सगळा सायबर फ्रॉड असल्याचे स्पष्ट झाले. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी याप्रकरणी यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून एफआयआर नोंदवण्यात आला आहे.

## संपादकीय ......

# मलिक तो बहाना है

*राज्यात मुंबईसह २९ महापालिका निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. पुढचा एक महिना बैठका, भेटीगाठी, सभा, रॅली, पदयात्रा, त्यातून दिल्या जाणार्या घोषणा, सवाल, आव्हाने, त्याला दिले जाणारे प्रत्युत्तर, त्यावर पुन्हा येणारी उत्तरे याचा धुरळा उडणार आहे. महानगरामधील मतदार आता मतदारराजा होऊन जाईल. गेल्या काही वर्षांपासून मतदारराणीचेही महत्त्व अधिक वाढले आहे. ही बाबही तशी लोकशाहीच्या भल्याचीच म्हणायला पाहिजे. जेवढ्या उपेक्षित घटकांकडे बारकाईने लक्ष देण्याची गरज राजकारण्यांमध्ये वाढेल, तेवढे शाही लोकांचे लोंढे लोकशाही रक्षणकर्त्यांच्या दारापुढे जातील. मतदारराणीला आता भांडी-साडीऐवजी थेट डीबीटी सुरू झाले. त्यातून तिने ॲनिमियाविरोधात लढावं, रक्तातील एचबीचं घटणारं प्रमाण वाढवत नेण्यासाठी अर्थपूर्ण नियोजन करावं. तर काही ठिकाणी स्वयंसिद्धा होण्यासाठी त्याचा वापर करावा, असं सांगितलं जातंय. वास्तवात काय होत आहे, याचं उत्तर निवडणुकीच्या धुरळ्यात झाकोळून जात आहे. आता राजेशाही राहिली नाही. राज्य जिंकण्याची लढाई मात्र सुरू आहे. पूर्वीचे राजे-महाराणी जीवाची बाजी लावून आपलं राज्य वाचवण्याची किंवा नवीन राज्य जिंकण्यासाठी लढाई लढत होते. आता लोकशाहीमध्येही राज्य वाचवण्याची लढाई आहे, फरक फक्त एवढाच की हातात भाला, बरची नि तलवारी नाहीत. आता शस्त्र आहेत धारदार शब्द, अस्त्र आहेत विकास योजना आणि जुलमी राजवटीला संपवण्याचा प्रत्येकाचा अजेंडा.*

*गेल्या कित्येक वर्षांपासून महापालिका निवडणुका रखडलेल्या होत्या. राज्यातील महापालिका हे एक स्वतंत्र संस्थानच आहे. तसं पाहिलं तर सर्व विधानसभा, लोकसभा मतदारसंघ हेदेखील स्वतंत्र संस्थानच बनलेले आहेत. प्रत्येक मतदारसंघ एका विशिष्ट घराण्याच्या ताब्यात आहे. वर्षानुवर्षे, पिढ्यानपिढ्या त्यांचीच सत्ता आणि त्यांचीच मत्ता. हेच हेरून भाजपने विविध राज्यांमध्ये अशा नेत्यांना एकत्र करून त्यांची मोळी बांधून सत्ता मिळवली. आता काहींना त्या कुबड्या वाटायला लागल्या आहेत. देशातील सर्वात मोठ्या पक्षाच्या दोन नंबरच्या नेत्याने आता कुबड्यांची गरज नसल्याचे मुंबापुरीत जाहीर करून टाकले. त्याची सुरुवात या पक्षाने मुंबईतूनच करण्याचा योग जुळून आला. राज्याच्या आणि केंद्राच्याही सत्तेत सहभागी असणार्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मुंबई महापालिकेत दूर ठेवण्यात आले. निमित्त झाले नवाब मलिक. राष्ट्रवादीचा जीव तसा भाजपच्याच एका नेत्याच्या म्हणण्यानुसार साडेतीन जिल्ह्यांपुरता. तरीही या पक्षाला सर्वात मोठ्या पक्षाने सोबत ठेवले आहे. मुंबई महापालिकेत मात्र राष्ट्रवादीचे भाजपला ओझे होऊ लागले आहे. तसा हा पक्ष कोणत्याही अर्थाने भाजपचा सहकारी होऊ न शकणार्या पक्षांच्या यादीतील, पण जिथे पीडीपीसोबत भाजप पाट लावू शकत असेल तिथे राष्ट्रवादी तर काहीच नाही. भाजपने ज्यांना उपमुख्यमंत्रीपद दिले त्यांच्यावर स्वत: पंतप्रधान मोदींनी ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचे आरोप केले होते. स्वत: मुख्यमंत्री फडणवीसांनी नाही.. नाही.. नाही.. म्हणत नाकारले होते. तरीही एकदा नाही तर दुसर्यांदा ते सोबत आहेत. मुंबई महापालिकेत मात्र या मित्राला सोबत घेण्याऐवजी त्याचा शिडी म्हणून वापर होऊ शकतो हे लक्षात घेऊन दूर ठेवले, मात्र फेकून दिलेले नाही.नवाब मलिकांचे दाऊदसोबत संबंध असल्याचा आरोप करून त्यांच्या नेतृत्त्वातील पक्षासोबत आघाडी न करण्याचे भाजपने जाहीर करून टाकले. एक, यामुळे आम्ही हिंदुत्ववादी हे ठसवण्यासाठी याचा उपयोग होईल. दोन, ठाकरेंच्या शिवसेनेकडे झुकलेला मुस्लीम मतदार यानिमित्ताने विभागला जाईल. भाजपकडून नवाब मलिक यांच्या नेतृत्त्वाला होणारा विरोध आणि राष्ट्रवादीकडून त्यांच्या नेतृत्त्वात मुंबई महापालिका लढण्याचा हट्ट, या दोन्ही गोष्टी स्क्रिप्टेड वाटाव्या एवढ्या जुळून येत आहेत. भाजपचा मुंबईतील थेट शत्रू हिंदुत्ववादी आहे. ठाकरेंची शिवसेना आणि मनसे यांच्या हिंदुत्वावर हल्ला करताना चार बोटं आपल्याकडे राहतील, त्यातील एक नवाब मलिकांचे असेल, हे टाळण्याचा हा तात्पुरता प्रयत्न आहे. मुंबई हल्ल्यातील आरोपींशी संबंधाचा आरोप मलिकांवर देवेंद्र फडणवीसांनीच केलेला. आता त्यांच्या नेतृत्त्वातील सरकारमध्ये सना नवाब मलिक या सत्ताधार्यांच्याच बाकावर बसतात, तेव्हा भाजपला त्यांच्या संबंधाचा विसर कसा पडतो? मात्र मुस्लीम मतांच्या ध्रुवीकरणासाठी आता याच मलिकांचा शिडी म्हणून वापर करता येत असेल तर का करू नये, हा निव्वळ राजकीय कावेबाजीचा डाव भाजप खेळत असल्याचे मुंबईकरांच्या लक्षात येणार नाही, असे भाजप नेत्यांना वाटत असेल तर त्यांचा हा भ्रमाचा भोपळा असाच राहू द्यायला हरकत नाही. मलिक आणि फडणवीस यांच्यात वैयक्तिक आरोप-प्रत्यारोप झालेले. त्यामुळे भाजपकडून होणारा विरोध हा तात्विक असण्यासोबतच वैयक्तिक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही मलिकांसह राष्ट्रवादी भाजपला आणि फडणवीसांना चालते. मग मुंबई महापालिकेतच मलिक अडचणीचे कसे ठरत आहेत. हे फडणवीस, भाजप आणि अजित पवार यांनी स्पष्ट करणे गरजेचे आहे. राजकीय नेत्यांच्या सोयीचे असेल तिथे त्यांना सर्व पवित्र होऊन जाते आणि जिथे अडचणीचे होईल, अशी पुसटशीही शंका येते तिथे पवित्रही अपवित्र ठरवले जात आहे. नेत्यांची ही नवी राजकीय खेळी मतदारराजाने ओळखण्याची गरज आहे. फक्त त्यांच्या शब्दांना, आश्वासनांना भुलून न जाता त्यांना त्यांच्याच शब्दांची आठवण करून देण्याची ही वेळ आहे.*

# सोमठाणा खुर्द येथील प्रकल्पग्रस्तांना मोबदला मिळणार

## कागदपत्रे सादर करण्याचे अकोट वन्यजीव विभागाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती,** मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत मौजे सोमठाणा खुर्द या गावाचे पुनर्वसन सन २०१३-१४ मध्ये करण्यात आले असून, या गावातील ४२ शेतमुल्यांकनधारक व २१ वनहक्कधारक यांना आता नवीन भूसंपादन कायद्यानुसार शेतीची एक पट रक्कम व त्यावरील ३० टक्के दिल्याचा रक्कम अदा करण्यात आलेले आहे. भूसंपादन कायदा २०१३ नुसार, मौजे सोमठाणा खुर्द येथील ४२ शेतमल्यांकनधारक व २१ हक्क धारक यांच्यासाठी निधी उपलब्ध झाला असून शेतमुल्यांकन व वन हक्कधारक यांना शेतीचा मोबदला रक्कम वितरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अकोट वन्यजीव विभाग यांनी यासंदर्भात माहिती दिली असून उर्वरित लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे तातडीने सादर करण्याचे आवाहन केले आहे.

मौजे सोमठाणा खुर्द येथील पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या तरतुदींनुसार झाले होते. सुरुवातीला शासन निर्णयानुसार ४२ शेतमुल्यांकनधारक व २१ वनहक्कधारक यांना शेतीच्या मूल्यांकनाची १ पट रक्कम आणि त्यावर ३० टक्के दिलासा रक्कम देण्यात आली होती. मात्र, केंद्र शासनाचा भूसंपादन अधिनियम २०१३ लागू झाल्याने आणि नवीन धोरणानुसार जमिनीचा मोबदला वाढीव दराने मिळणे अपेक्षित असल्याने, आता या लाभार्थ्यांना मुल्यांकनाच्या ४ पट रक्कम देय ठरली आहे. त्यानुसार, यापूर्वी अदा केलेली १ पट रक्कम व ३० टक्के दिलासा रक्कम वजा करून उर्वरित मोबदला वितरित करण्यासाठी निधी उपलब्ध झाला आहे. काही लाभार्थ्यांना यापूर्वीच रक्कम अदा करण्यात आली आहे, परंतु उर्वरित शेतमुल्यांकनधारक व वनहक्कधारकांनी अद्याप आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नाहीत. यामुळे प्रशासनाला देय रक्कम वितरित करण्यात तांत्रिक अडचणी येत आहेत. तरी संबंधित लाभार्थ्यांनी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर अर्ज, बँक पासबुकची छायाप्रत, शेतीचा ७/१२ उतारा आणि मूळ खातेदार मयत असल्यास वारस प्रमाणपत्र व वारसाच्या बँक खात्याची छायाप्रत अकोट वन्यजीव विभाग कार्यालयात तात्काळ जमा करावी. लाभार्थ्यांची नावनिहाय यादी महाराष्ट्र वनविभागाच्या‌ु.ारहर्षीशीीं.सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध असून, ग्रामस्थांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपला प्रलंबित मोबदला प्राप्त करून घ्यावा, असे आवाहन अकोट वन्यजीव विभाग उपवनसंरक्षक आर. एस. टोलिया यांनी केले आहे.

# शहरात कलम ३७ (१) व (३) लागू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ अमरावती,** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी महाराष्ट्र पोलीस अधिसूचना व आदेशान्वये पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

अधिसूचना महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) नुसार शस्त्र तसेच विस्फोटकाच्या मालाची वाहतूक, जमावाचे एकत्रीकरण, बदनामीकारक वक्तव्य तसेच कलम ३७ (३) नुसार कोणत्याही मानवी मेळाव्यास, मिरवणुकीस कोणत्याही ठिकाणी आयोजित करण्यास सार्वजनिक सुरक्षिततेसाठी धोका होण्याची शक्यता लक्षात घेऊन उपरोक्त नमूद कालावधीकरिता बंदी घालण्यात येत आहे.

सदर प्रतिबंधात्मक आदेश शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालयाचे परिक्षेत्र वगळून करण्यात आला असून दि. ३० डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी कळविले आहे.

# तूर, मूग, उडीद, चणा आणि मसूर; पोषणतज्ज्ञांनी सांगितलं कोणती डाळ कधी खावी?



**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

डाळी या आपल्या भारतीय आहाराचा एक अविभाज्य भाग आहेत. दिवसातून एकदा तरी आहारात डाळींचा समावेश असतो. डाळींचे तूर, मूग, उडीद, चणा आणि मसूर असे वेगवेगळे प्रकार असतात. प्रत्येक डाळीचे वेगवेगळे फायदे शरीराला होत असतात. पण यापैकी कोणती डाळ कधी आणि कशाप्रकारे खावी याबाबत पोषणतज्ज्ञांनी सल्ला दिला आहे. चला तर मग याबद्दल जाणून घेऊया




**तूर डाळ-** तूर डाळ ही जवळपास सर्वांना आवडते. पोषणतज्ञ सल्ला देतात की तूर डाळ नेहमी एक तास भिजवून हळद आणि हिंग घालून शिजवावी. यामुळे ती पचण्यास सोपी होते आणि पोटफुगी, गॅस यांसारख्या समस्या होत नाहीत. तसेच दुपारच्या जेवणात तूर डाळीचा समावेश करावा.

**मूग डाळ-** वजन कमी करण्यासाठी, मधुमेहाच्या रुग्णांसाठी आणि वृद्धांसाठी ही डाळ खूप फायदेशीर मानली जाते. रात्रभर भिजवून मोड आलेले मूग आहारात समाविष्ट करावे. मूग आहारात दुपारी किंवा रात्री कधीही घेऊ शकता.

**उडदाची डाळ-** उडीदाची डाळ ताकद, हाडे आणि सहनशक्ती वाढवण्यास उपयुक्त आहे, पण ती पचायला जड असते. त्यामुळं ती नेहमी रात्रभर भिजवून आंबवून आहारात घ्यावी. त्यात पचण्यासाठी हिंग आणि आलं घालावं. दुपारच्या जेवणात ही डाळ खाण्याची शिफारस पोषणतज्ञ करतात.

**चणा डाळ-** चणा डाळ फायबरने समृद्ध असते आणि मधुमेहासाठी फायदेशीर असते. ती २-३ तास किंवा रात्रभर भिजवून दुपारच्या जेवणात खावी. मात्र चणा डाळ भिजवल्याशिवाय कधीही खाऊ नये आणि लहान मुलांना ही डाळ जास्त प्रमाणात देणं टाळावं.

**पिवळी मूग डाळ-** ही सर्वात हलकी डाळ असते. लहान मुले, वृद्ध आणि आजारी असलेल्यांना ही डाळ द्यावी. पोषणतज्ञांच्या मते, तुम्ही दिवसभरात कधीही पिवळी मूग डाळ खाऊ शकता.

**मसूर डाळ-** मसूर डाळ लोहाने समृद्ध असते आणि ती महिलांसाठी फायदेशीर असते. ही सर्व डाळींमध्ये लवकर शिजणारी डाळ आहे. तुम्ही ती दुपारच्या जेवणात आणि रात्रीच्या जेवणात दोन्ही वेळी खाऊ शकता. मात्र किडनी स्टोन असलेल्यांनी नियमितपणे मसूर डाळ खाऊ नये.

# थंडीत आंबा मोहोर वाळण्याची शक्यता, परागीभवन होण्यासाठी 'हे' उपाय करा, वाचा सविस्तर

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

आंबा मोहराचे परागीभवन मुख्यत्वे कीटक आणि वाऱ्यामुळे होते, ज्यात मधमाश्या व इतर कीटक परागकण नर फुलांपासून मादी फुलांपर्यंत पोहोचवतात, पण अति थंडी व मावा-तुडतुडे यांसारख्या किडींमुळे हे परागीभवन नीट होत नाही, ज्यामुळे फळधारणा कमी होते. या काळात आंबा मोहोराची विशेष काळजी घ्यावी लागते.

**आंबा मोहोर नियोजन**

आंबा मोहोरामध्ये नर व संयुक्त फुले ओळखणे आवश्यक आहे.

विदर्भ प्रजासत्ताक **कृषी** विशेष

अति थंडीमुळे नर फुलांचे प्रमाण वाढून संयुक्त फुलांचे प्रमाण अतिशय कमी होते.




तसेच थंडीमुळे परागीभवन करणारे कीटक कमी प्रमाणात आढळतात.

यामुळे परागीभवन न होता आंबा मोहोर वाळताना दिसतो.

आंबा मोहोरातील परागीभवन वाढविण्यासाठी हाताजवळील मोहोरावरून हात फिरवावा, उंच फांदीवरील मोहोरासाठी बांबूच्या काठीला केरसुणी बांधून फिरवावी.

आंबा बागेत कीटकांना आकर्षित करण्यासाठी सुका मासा पाण्यात भिजवून लटकवावा.

यासाठी निकृष्ट दर्जाच्या बांगडा माशाची निवड करावी.

माशाला पक्षांपासून वाचविण्यासाठी रिकाम्या बाटलीचा तळ काढून बुचातून तार घालून आत माशाचा काही भागात लटकत ठेवावा.

या लटकवलेल्या माशाचा वास पसरावा, म्हणून बाटलीला झरोके निर्माण करावेत.

यामुळे परागीभवन करणारे कीटक विशेष करून माशा आकर्षित होऊन आंब्यामध्ये परागीभवन होताना आढळते.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी

# सैनिक कल्याण विभागात ७२ लिपिक पदांची भरती

## ३१ डिसेंबरपर्यंत ऑनलाईन अर्जाची मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

महाराष्ट्र राज्य सैनिक कल्याण विभाग, पुणे आणि त्यांच्या अधिपत्याखालील विविध जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमध्ये 'लिपिक टंकलेखक (गट-क)' या संवर्गातील एकूण ७२ रिक्त पदांच्या भरतीसाठी प्रक्रिया राबविण्यात येत असून पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

या भरती प्रक्रियेत महाराष्ट्र राज्याचे अधिवास असलेले माजी सैनिक तसेच शासन निर्णयानुसार युद्ध काळात किंवा शांततेच्या काळात सैनिकी सेवेत कार्यरत असताना शहीद झालेल्या किंवा अपंगत्वामुळे नोकरीसाठी अयोग्य ठरलेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील एका वारसदाराला पात्रतेनुसार अर्ज करता येणार आहे. एकूण ७२ पदांपैकी ३ पदे किमान ४० टक्के दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली असून, दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार व गुणवत्तेनुसार ही निवड केली जाणार आहे. या संपूर्ण भरती प्रक्रियेसाठी ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज स्वीकारले जाणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी विभागाचे अधिकृत संकेतस्थळ www.mahasainik.mahara shtra.gov.in यावरील 'Resources' आणि 'Recruitment' टॅबमध्ये जाऊन ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत आपले अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. विहित मुदतीनंतर वेबलिंक बंद होणार असून इतर कोणत्याही माध्यमातून आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, यांनी कळविले आहे.

# सीईओ महापात्र यांचा नवोदित अधिकाऱ्यांशी संवाद

## प्रशिक्षणार्थी डीएसपी, डेप्युटी कलेक्टर यांना भविष्यातील कामकाजाचे धडे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेल्या २० परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी बुधवारी अमरावती जिल्हा परिषदेला भेट दिली. जिल्हा परिषदेचे कामकाज समजून घेण्यासाठी त्यांनी हा दौरा केला. 'यशदा'चे सत्र संचालक डॉ. आर. व्ही. पोले यांच्या नेतृत्वाखाली हे अधिकारी १९ डिसेंबरपर्यंत राज्यभर अभ्यास दौरा करत आहेत.या अभ्यास दौऱ्याचाच एक भाग म्हणून, बुधवारी सकाळी या अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेला भेट दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) संजीता महापात्र यांनी त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी पंचायत विभागाचे डेप्युटी सीईओ बाळासाहेब बायस आणि सामान्य प्रशासन विभागाचे डेप्युटी सीईओ श्रीराम कुलकर्णी उपस्थित होते.




या दोन्ही अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमांची माहिती दिली. सीईओ संजीता महापात्र यांनी मेळघाटमधील विकासात्मक उपक्रमांबद्दल माहिती दिली. त्यांनी भविष्यात प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करताना लोकाभिमुख दृष्टिकोन, संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीव ठेवण्याबाबत मार्गदर्शन केले. प्रशासनातील अनुभवातून मिळालेल्या महत्त्वपूर्ण टिप्सही त्यांनी दिल्या. या भेटीमुळे परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष प्रशासकीय कामकाजाची ओळख झाली आणि भविष्यातील जबाबदाऱ्यांची जाणीव झाली, असे त्यांनी नमूद केले. या परिविक्षाधीन अधिकाऱ्यांमध्ये श्रद्धा उधवंत, सौरभ रंगटे, प्रणीता काळे, प्रतीभा काळे, अलम पंडू, परागीणी पाटील, अशोक बाराखोटे, सुनील धमाल, विठ्ठल पवार, सितारामजी रेवतकर, प्राजक्ता पाटील, आशिष खेनत, मच्छींद्र मिरकार, अनिकेत शकार्गे, राजू डोके, किरण काकडे, आशिष तालेवार, शुभम खोसे, नितीन मोरे, युवराज इकाद, महेश चोथे आणि स्नेहल माटे यांचा समावेश आहे. हे सर्व अधिकारी भविष्यात उपजिल्हाधिकारी, डीवायएसपी, गट विकास अधिकारी, सहायक विक्रीकर आयुक्त, सहायक परिवहन अधिकारी तसेच लेखा व कोषागार अधिकारी अशा विविध पदांवर कार्यरत होणार आहेत.

# जागतिक ख्यातीचे शिल्पकार राम सुतार यांचे निधन

## , शिल्पकलेतील भीष्माचार्य हरपले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नवी दिल्ली**



महाराष्ट्राचा सर्वोच्च नागरी पुरस्काराने महाराष्ट्र भूषणने सन्मानित झालेले ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांचे निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने शिल्पकार क्षेत्रातील भीष्माचार्य गमावल्याची प्रतिक्रिया येत आहे. वयाच्या १०० व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. उत्तर प्रदेशमधील नोएडामधील राहत्या घरी त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे चिरंजीव अनिल सुतार, सुना नातवंडे असा परिवार आहे. राम सुतार यांच्या पार्थिवावर आज (१८ डिसेंबर) सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार होतील. त्यांची अंत्ययात्रा -२ सेक्टर १९, नोएडा येथून सुरू होऊन सेक्टर ९४, सुपरनोव्हा इमारतीजवळ थांबेल, अशी माहिती त्यांचे पुत्र अनिल सुतार यांनी दिली.

शेकडो शिल्पांना आकार देऊन जिवंत करणारे जागतिक कीर्तीचे शिल्पकार राम सुतार यांचं बुधवारी (१७ डिसेंबर) मध्यरात्रीनंतर निधन झाले. ते यंदा १९ फेब्रुवारी रोजी वयाची १०१ वर्षे पूर्ण करणार होते. तत्पूर्वीच काळाने त्यांच्यावर घाला घातला. शिल्पकलेतील चालता बोलता इतिहास, अशी त्यांची ओळख होती. राम सुतार यांनी ६ दशकांत २०० हून अधिक भव्य शिल्पांची निर्मिती केली. त्यांची शिल्प जगभरात आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रिम प्रोजेक्ट असलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांचा स्टॅच्यू ऑफ युनिटीचा यात प्रामुख्याने समावेश करावा लागेल. पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत यांच्यासह अन्य दिग्गज नेत्यांचे पुतळे राम सुतार यांनी निर्माण केले आहेत. विशेष म्हणजे मुंबईतील इंदू मिलमधील 'स्टॅचू ऑफ इक्वॉलिटी' भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचं कामही राम सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली तयार होत होते. तत्पूर्वीच त्यांचे निधन झाले.

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १८ डिसेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त राकेश ओला व महापालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची मतगणना केंद्रांची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती** आगामी मतमोजणी प्रक्रिया शांततेत, पारदर्शक व सुरळीतपणे पार पडावी, त्याच अनुषंगाने अमरावती पोलिस आयुक्त राकेश ओला व अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी शहरातील महत्त्वाच्या मतगणना केंद्रांची सविस्तर पाहणी केली. या पाहणीमध्ये मतगणना स्पोर्ट









कॉम्प्लेक्स तसेच सांस्कृतिक भवन व निवडणूक निर्णय अधिकारी २ यांचे नविन तहसिल कार्यालय या ठिकाणांचा समावेश होता.या पाहणीदरम्यान दोन्ही आयुक्तांनी मतमोजणीसाठी उभारण्यात आलेल्या पायाभूत सुविधांची तपासणी केली. मतगणना केंद्रात प्रवेश व निर्गमनासाठी स्वतंत्र मार्ग, उमेदवारांचे प्रतिनिधी, माध्यम प्रतिनिधी तसेच निवडणूक कर्मचारी यांच्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था तपासण्यात आली. कोणत्याही प्रकारचा गोंधळ किंवा गैरप्रकार होऊ नये, यासाठी सुरक्षा व्यवस्थेचा विशेष आढावा घेण्यात आला.पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी मतगणना केंद्र परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्याच्या सूचना दिल्या. सीसीटीव्ही कॅमेरे, मेटल डिटेक्टर, अतिरिक्त पोलिस फौजफाटा, दंगा नियंत्रण पथक तसेच त्वरित प्रतिसाद देणाऱ्या पथकांची तैनाती करण्याबाबत त्यांनी स्पष्ट निर्देश दिले. कायदा व सुव्यवस्था राखणे ही प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी असून कोणतीही अनुचित घटना खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी मतगणना केंद्रांवरील मूलभूत सोयी-सुविधांवर भर दिला. वीजपुरवठा, पाणी, स्वच्छता, अग्निसुरक्षा यंत्रणा, वैद्यकीय मदत तसेच आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ उपाययोजना करण्याची तयारी ठेवण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. मतगणना प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी सांगितले. या पाहणीप्रसंगी निवडणूक विभागाचे अधिकारी, महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित विभागांचे प्रमुख उपस्थित होते. सर्व अधिकाऱ्यांनी आपापल्या जबाबदाऱ्या काटेकोरपणे पार पाडाव्यात आणि मतगणना प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सतर्क राहावे, अशा सूचना देण्यात आल्या. प्रशासनाकडून मतगणनेसाठी सर्व तयारी अंतिम टप्प्यात असून नागरिकांनीही शांतता व सहकार्य राखावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. मतमोजणीच्या दिवशी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी पोलिस व महानगरपालिका यंत्रणा पूर्णतः सज्ज असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.या पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, पोलीस अधिकारी व मनपा अधिकारी उपस्थित होते.-

# गावाची लोकसंख्या १६००,जन्म नोंदी २७,९७

## यवतमाळच्या शेंदूरसनी येथे जन्म-मृत्यू घोटाळा

### एसआयटी चौकशीची किरीट सोमय्यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



**तांत्रिक अडचणीमुळे पोर्टल दीड वर्षांपासून होते बंद...**

ग्रामसेवक व सरपंचांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० जानेवारी २०२४ रोजी सीआरएस पोर्टलवर शेंदुरसनी ग्रामपंचायतीच्या संगणकावर २७३९७ जन्मनोंदी झाल्या. मागील दीड वर्षांपासून तांत्रिक अडचणीमुळे पोर्टल बंद होते. ते पुन्हा सुरू झाल्यावर हा प्रकार उघडकीस आला.

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८यवतमाळ-**

यवतमाळ जिल्ह्यातील शेंदुरसनी या गावाची लोकसंख्या केवळ १६०० असताना येथे सुमारे २७ हजार ३९७ जन्मनोंदी झाल्याचे समोर आले. हा प्रकार पहिल्यांदा २४ नोव्हेंबर २०२५ रोजी लक्षात आला होता. पुढील चौकशीत हा मोठा आंतरराज्यीय घोटाळा आहे. सायबर क्राईम असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे गुन्हाही दाखल झाला. याची महिती मिळाल्यावर भाजप नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी एसआयटी व दिल्ली सायबर विभागाकडून चौकशीची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.सोमय्या बुधवारी मुंबईहून थेट शेंदुरसनी येथे पोहोचले. त्यांच्यासोबत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले, उपजिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. क्रांतिकुमार नावंदीकरांसह अनेक शासकीय अधिकारी होते. पत्रकार परिषदेत सोमय्यांनी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. चौकशीअंती २७ हजार ३९७ जन्म नोंदी व ७ मृत्यू नोंदी या ग्रामपंचायत क्षेत्रातील नसून संशयास्पद असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे तांत्रिक तपासणीसाठी हे प्रकरण उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ), पुणे यांच्याकडे पाठवण्यात आले आहे.

**दिल्लीला सखोल तपासणी**

राज्यस्तरीय लॉगिनवरून तपासणीअंती शेंदुरसनी ग्रामपंचायतीचा सी.आर.एस. आयडी मुंबई येथे मॅप असल्याचे निदर्शनास आले. तसेच सखोल तपासणीसाठी हे प्रकरण भारताचे अतिरिक्त रजिस्ट्रार जनरल कार्यालय व राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र (एनआयसी), दिल्ली यांच्याकडे पाठवले आहे.

# वरलीमटका चालविणाऱ्यांवर कडक कारवाई

## मटकाकिंगचे एजंट 'लाल'शहरातील वरलीमटका चालकांची सीपीसमोर पेशी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती-** पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी पोलीस आयुक्त पदाचा पदभार सांभळताच बुधवारी शहरातील सर्व वरली मटका चालकांची पेशी घेतली. मात्र मुख्य मटका किंगने स्वतः ऐवजी हस्तकाला पाठवीले होते. आयुक्तांनी त्या हस्तकाला चांगलेच लाल केले. या पेशीदरम्यान बंद दरवाज्यातून बाहेर पट्ट्याचा आवाज येत होता.



पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी अमरावती पोलीस आयुक्त पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर सायंकाळी भाजीबाजार येथे पवन वानखडे यांच्या हत्येच्या ठिकाणाची पाहणी केली. तसेच पूर्ण घटनेची माहिती घेतल्यानंतर खोलापुरीगेट ठाण्याची पाहणी केली आणि तपास अधिकाऱ्यांना महत्वाच्या सुचना दिल्या. बुधवारी आयुक्त कार्यालयातील कामकाजाची माहित घेतल्यानंतर शहरातील सर्व वरलीमटका चालकांची फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन गुन्हेशाखेच्या कार्यालयात पेशी घेतली. यावेळी शहरातील २० ते २५ वरलीमटका चालक हजर झालेहोते. प्रत्येकाला आत बोलावून त्यांची पूर्ण माहिती आयुक्तांनी घेतली आणि यापूढे शहरात वरलीमटका सूरू करायचा नाही, असे स्पष्ट बजावले. यावेळी शहरातील मुख्य वरलीमटका चालक हजर नव्हते, त्यांनी आपल्या हस्तकांना पाठविले होते. वरलीमटका किंग न आल्यामुळे आयुक्तांनी हस्तकालाच लाल केले. त्यावेळी बंद दरवाज्यातून पट्ट्याचा आवाज बाहेर येत होता. एका मागे एक प्रत्येकाला बोलाविले जात होते.नंबर आला तो आत जात होता, मात्र बाहेर येतांना दोन्ही हात चोळत बाहेर येत होता आणि खाली मान टाकून उभा राहत होता. हा प्रकार पाहून वरलीमटका चालक मोठ्या हिमतीने एक दुसऱ्याच्य चेहऱ्याकडे पाहत होते आणि आत जात होते.सुमारे एक ते दिड तास पेशी चालली. शहरात वरलीमटका चालणार नाही, असे आयुक्तांनी सक्तपणे बजावले. पोलीस आयुक्तांच्या आक्रमक पवित्र्यामुळे शहरातील वरलीमटका चालकांचे धाबे चांगलेच दणाणल्याचे दिसून आले.

# श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयांमध्ये आजपासून डॉ. पंजाबराव देशमुख क्रीडा महोत्सव



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती-** विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी येत्या १८ व १९ डिसेंबर २०२५ रोजी श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारा डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त वार्षिक भव्य 'क्रीडा महोत्सवाचे' आयोजन श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले आहे. सदर स्पर्धेमध्ये प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक , कनिष्ठ महाविद्यालयातील सुमारे १५०० हून अधिक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. या दोन दिवसीय स्पर्धेचे उद्घाटन १८ डिसेंबर रोजी सकाळी १०:०० वाजता श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. हर्षवर्धनजी देशमुख यांच्या अध्यक्षतेतसंस्थेचे कोषाध्यक्ष श्री. दिलीपबाबु इंगोले यांच्या हस्ते होईल.या कार्यक्रमालाप्रमुख अतिथी म्हणून डॉ. तनुजा राऊत, प्र-संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती उपस्थित राहतील.या क्रीडा स्पर्धेत थलेटिक्स मध्ये धावणे (१००, २०० व ४०० मीटर), लांब उडी, गोळाफेक यांसारख्या वैयक्तिक क्रीडा प्रकारांसह कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल यांसारख्या सांघिक खेळांचेही आयोजन करण्यात आले आहे.स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजेच १९ डिसेंबर रोजी विविध खेळांच्या अंतिम फेऱ्या पार पडतील. त्यानंतर संध्याकाळी ४:०० वाजता बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे . श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ उपाध्यक्ष ड. गजाननराव पुंडकर यांच्या अध्यक्षतेत होईल. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष, ड.जयवंत उपाख्य भैय्यासाहेब वि. पाटील (पुसदेकर) व कार्यकारिणी सदस्य प्रा. सुभाष बनसोड,१९ व्या आशियाई खेळातील र ज त प द क विजेता तुषार शेळके यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना चषक,पदक, पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. या स्पर्धेच्या आयोजना करीता संस्थेचे सचिव प्राचार्य वि.गो ठाकरे, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य तथा स्पर्धेच्या आयोजन समितीचे सचिव डॉ. सुभाष गावंडे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपव्यवस्थापक पंडित पंडागळे व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# शनिवारपासून बहिरम यात्रेला सुरुवात

### भाविकांसाठी शुद्ध पाणी, फिरते दवाखाने, पार्किंगची सोय करा:

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी बैठकीत दिले निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

सर्वाधिक काळ चालणारी विदर्भातील प्रसिद्ध बहिरम यात्रेच्या पूर्वतयारीसाठी तेथील मंदिर कार्यालयामध्ये विशेष नियोजन व आढावा सभा घेण्यात आली. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व विभागांना महत्त्वपूर्ण निर्देश देण्यात आले. यामध्ये वाहतूक नियंत्रण, पार्कींगस्थळ, खाद्य पदार्थ आणि पाण्याची शुद्धता, फिरते दवाखाने आदींचा समावेश आहे. येत्या शनिवारपासून यात्रोत्सवाला सुरुवात होणार आहे. तब्बल दीड महिन्यांपर्यंत ही यात्रा चालते. या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सर्व विभागांच्या कामाचा सविस्तर आढावा घेतला आणि भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, यादृष्टीने समन्वयाने काम करण्याचे आदेश दिले. मंदिर परिसरात सीसीटीव्ही आणि स्वच्छता राखण्यावरही यावेळी विशेष भर देण्यात आला. बैठकीला उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) बाळासाहेब बायस, गटविकास अधिकारी डॉ नीलेश वानखडे, उपविभागीय महसूल अधिकारी बळवंत अरखराव, एबीडीओ गणेश घोगरकर, यात्रा व्यवस्थापक रामेश्वर रामागड, शिरजगाव कसबाचे ठाणेदार गवई यांच्यासह तालुका आरोग्य अधिकारी, बांधकाम उपअभियंता, पाणीपुरवठा उपअभियंता, ग्रामपंचायत, मंदिर प्रशासन, विद्युत व वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बहिरम यात्रेच्या नियोजन बैठकीला मार्गदर्शन करताना जि.प. च्या सीईओ संजीता महापात्र. अन्न व औषधी प्रशासन विभागाने सर्व खानावळींची नियमित तपासणी करावी आणि स्वच्छतेचे नियम पाळले जातील, याची खात्री करावी, अशा सूचना दिल्या. वाहतूक व पार्किंग- शनिवार आणि रविवारी यात्रेत मोठी गर्दी होत असल्याने वाहतुकीचा खोळंबा होऊ नये, यासाठी पोलीस विभागाला विशेष पार्किंग व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

माकडांचा बंदोबस्त व सुरक्षा- यात्रेचे ठिकाण जंगल परिसराजवळ असल्याने माकडांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात होतो. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी वन विभागाला सतर्क राहण्यास सांगण्यात आले आहे. वीज आणि पाणीपुरवठा- यात्रेच्या काळात अखंडित वीजपुरवठा रहावा, यासाठी विद्युत विभागाने खबरदारी घ्यावी तसेच पाणीपुरवठा विभागाने शुद्ध पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था करावी. आरोग्य सुविधा- यात्रा काळात आरोग्य विभागाने तात्पुरते दवाखाने आणि २४ तास रुग्णवाहिका तैनात ठेवावी. ''स्वच्छ बहिरम'' अभियानांतर्गत कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र पथके नेमण्याच्या सूचना दिल्या. यात्रेच्या काळात कुठेही अस्वच्छता होणार नाही आणि प्लास्टिकचा वापर होणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देश दिले.

# तिवसा तालुक्यातील प्रवासी निवाऱ्याची दयनीय अवस्था

## निवाऱ्यातील भिंतींवर अश्लील लिखाण,दगडी बाके गायब

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८तिवसा -** तिवसा ते कुऱ्हा या मार्गावर एशियन डेव्हलपमेंट बँक आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या संयुक्त निधीतून लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेली प्रवासी निवारे काही महिन्यांतच दुर्दशेला सामोरी जात असून, ग्रामीण प्रवाशांसाठी उभारलेल्या या सोयी आज अक्षरशः वाऱ्यावर सोडल्या गेल्या आहेत.तिवसा तालुक्यात ग्रामीण भागात काही ठिकाणी एस.टी. डेपो नसल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी, महिला, वृद्ध नागरिक व मजूर वर्ग यांची थांबण्याची पावसापासून, उन्हापासून संरक्षण मिळविण्यासाठी या प्रवासी निवाऱ्याची उभारणी करण्यात आली आहे. एकमेव सरकारी सोय म्हणून प्रशासनाने प्रवासी निवाऱ्याची निर्मिती केली.परंतु पाहता पाहता या प्रवासी निवार्यातील दगडी बाके गायब झाली आहे तर काही ठिकाणी बाके तुटून पडले आहे. काही ठिकाणी लोखंडी रेलिंग उचलून नेलेली आहे. प्रवासी निवाऱ्यातील भिंतींवर अश्लील लिखाण केले आहे तर काही ठिकाणी कचऱ्याचे ढीग, गारे, दुर्गंधी, छताची उडालेली रंगसफेदी आणि रात्री दारुड्यांचे अड्डे - अशी विदारक स्थिती निर्माण झाली आहे. जिथे मुली व महिलांनी सुरक्षित थांबायला हवे तिथे अश्या प्रकारचे चित्र उभे राहिले आहे. रात्रीच्या वेळी अवैध मद्यपींची वर्दळ वाढत असून प्रवाशांच्या सुरक्षिततेला मोठा धोका निर्माण झाला आहे.आश्चर्य म्हणजे काही ठिकाणी तर प्रवासी या निवाऱ्यांत थांबायलाही तयार नाहीत. निवाऱ्याच्या आत उभं राहण्यापेक्षा लोक झाडाखाली उभे राहून बस वा वाहन येण्याची वाट पाहत आहेत. पावसात भिजतात, उन्हात भाजतात, पण निवाऱ्याकडे बघायलाही तयार नाहीत. कारण त्यांची अवस्था पाहूनच तिथे पाऊल ठेवण्याचं धाडस अद्याप तरी कुणीच केलेले नाही. या निवाऱ्यांचा मालक कोण, देखभाल कोण करणार, जबाबदार कोण - याकडे प्रशासनाने दुर्लक्षच केल्याचं दिसून येत आहे. लाखो रुपयात उभारलेली सार्वजनिक सोय आज फक्त कचरा टाकण्याची जागा व पानफेक, मद्यपींची मौजमजा करण्याची खोली ठरत असताना, जर तातडीने दुरुस्ती, सफाई व सुरक्षा व्यवस्था पुरवली नाही, तर ही काही निवारे प्रवाशांच्या सेवेसाठी नव्हे तर सरकारी पैशाच्या वाया गेलेल्या उधळपट्टीचे गुटक्याच्या पिचकारीसारखे कायमचे व्यंगचित्र बनून राहणार यात शंका नाही.





आमच्यासारख्या वृद्धांना उन्हापासून आणि पाण्यापासून संरक्षण मिळावे यासाठी प्रवासी निवारे बांधण्यात आलेले आहे, पण आज त्यांची अवस्था पाहून तिथे बसण्याची इच्छा होत नाही. बसण्याचे दगडाचे बेंच तुटलेली, दुर्गंधी, कचरा यामुळे येथे बसावं असे वाटत नाही. आमच्यासाठी बांधलेली सोय आम्हालाच वापरता येत नाही, ही दुर्दैवी गोष्ट आहे. प्रशासनाने एकदा उभारणी केली की त्याकडे पुन्हा लक्ष देत नाही, म्हणून ह्या सुविधा दिसायला आहेत, पण काहीच उपयोग नाही.- **वासुदेव चौधरी,** जेष्ठ नागरिक, कवाडगव्हाण

आम्ही महाविद्यालयाला जाण्यासाठी दररोज बसची वाट बघतो, पण या प्रवासी निवाऱ्यात थांबण्यापेक्षा झाडाखाली उभं राहणं सुरक्षित वाटतं. आत इतका कचरा, दुर्गंधी मुळे तिथे उभं राहण्याचं मनच होत नाही. महिला आणि विद्यार्थ्यांसाठी ही सोय केली असं सांगितलं, पण प्रत्यक्षात वापर करणं जीवावर येतंय. कितीही उन्हं असो किंवा पाऊस पडो, आम्ही तिथे जाण्यापेक्षा बाहेर उभं राहणं पसंत करतो. इतक्या पैशात बांधलेलं असलं तरी सुरक्षित नसेल तर त्याचा उपयोगच काय.

**-वृषाली प्रमोद थोरात, विद्यार्थ्यांनी, पालवाडी**

# कावलीत चालतोय दोन दिवस अखंड भजनाची मांडश्री समर्थ योगेश्वर महाराज संस्थान तनाची झोपडी

विदर्भ प्रजासत्ताक


**दि.१८धामणगाव रेल्वे-** तालुक्यातीलकावली येथील श्री समर्थ योगेश्वर महाराज संस्थान तनाची झोपडी येथे मार्गशीर्ष त्रयोदशी निमित्य दोन दिवस अखंड भजनाची मांड सुरू राहणार असून गुरुवारी दुपारी महाप्रसाद आयोजित केला आहेकावली येथे अवधूत महाराज यांचे जागृत मंदिर म्हणजे श्री समर्थ योगेश्वर महाराज संस्थान तनाची झोपडी आहे यंदा मार्गशीर्ष महिना निमित्त बुधवार ला पहाटेच्या चौघड्यापासून अवधूत भजनाची मांड बसवून जागरण सुरू झाले आहे दुपारी बारा वाजेपर्यंत हा ४८ तास अखंड भजनाचा कार्यक्रम सुरू राहणार आहे.



# टीईटी परीक्षा सक्तीचा फटका

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने शिक्षक पदोन्नतीला ब्रेक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती :**




शिक्षक सेवेत कायम राहण्यासाठी व पदोन्नती करिता टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या सर्वोच्च निकालामुळे शिक्षण विभागातील विविध पदांच्या पदोन्नतीला ब्रेक लागला आहे.राज्यातील एकाही जिल्हा परिषदेने सर्वोच्च न्यायालयाने टीईटीबाबत दिलेल्या निकालानंतर पदोन्नती प्रक्रिया राबवलेली नाही. ही पदोन्नती थांबल्याने निवृत्तीच्या अखेरच्या टप्प्यात असलेल्या व पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या शिक्षक वर्गात मोठी नाराजी आहे.सर्वोच्च न्यायालयाने एक सप्टेंबर रोजी टीईटी परीक्षेबाबत निकाल दिला. न्यायालयाच्या या निर्णयावर केंद्र शासन व राज्य शासनाने कोणतेही आदेश अद्याप काढलेले नाहीत. मात्र, तरीही सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर गेल्या चार महिन्यांत राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात पदोन्नती प्रक्रिया राबविलेली नाही.शिक्षण विभागात विषय शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी अशा पदांवर पदोन्नती दिली जाते. सेवाज्येष्ठतेने ही पदोन्नती देतात. सेवानिवृत्तीच्या शेवटच्या दोन-चार वर्षांत ही पदोन्नती मिळते.टीईटीच्या निर्णयानंतर काही राज्य सरकारांनी पुनर्विचार याचिका दाखल केल्या आहेत. महाराष्ट्र शासनानेही पुनर्विचार याचिका दाखल करावी, यासाठी शिक्षक संघटनांनी मोर्चा, शाळा बंद आंदोलने केली.दिल्ली येथे सुरू असलेल्या अधिवेशनात खासदार धैर्यशील माने यांनी टीईटीबाबत केंद्र शासनाने पुनर्विचार याचिका दाखल करण्याची लक्षवेधीद्वारे मागणी केली. शिवाय अनेक खासदारांनी याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटून निवेदन सादर केले.नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात अनेक आमदारांनी टीईटीबाबत आवाज उठविला. यावर टीईटी संदर्भात निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाने समिती स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला. अमरावतीत केंद्रप्रमुख,मुख्याध्यापक पदोन्नतीचे आदेश रखडलेआहे.या मागणी करीता शिक्षक-शिक्षकेत्तर संघटना समन्वय समितीने राज्यव्यापी ५डीसेंबरला सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे आणि धरणे आंदोलन केले होते.तसेच ९डीसेंबरला नागपूर हीवाळी अधिवेशनावर शिक्षकांनी भव्य मोर्चा काढला होता.या मोर्चात राज्यभरातुन हजारो शिक्षक सहभागी झाले होते.

> ’टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्यास सर्वोच्च न्यायालयाने दोन वर्षांची मुदत दिली आहे. त्यानुसार पदोन्नती देतानाही दोन वर्षांची अट टाकून पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात यावी. सेवाज्येष्ठता व पात्र असलेल्या शिक्षकांना वेळेत पदोन्नती मिळणे गरजेचे आहे.
>
> **-राजेश सावरकर,**राज्य प्रसिध्दी प्रमुखमहाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती.-

# महानगरपालिका निवडणुकीसाठी युवा स्वाभिमान पार्टीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ४३८ इच्छुक उमेदवारांची अर्ज उचल पूर्ण आज पासून मुलाखतीला सुरुवात



**दि.१८अमरावती**

**अमरावती-** येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीसाठी युवा स्वाभिमान पार्टीकडून लढण्यास इच्छुक उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला आहे. पक्षातर्फे राबविण्यात आलेल्या अर्ज उचल प्रक्रियेत एकूण ४३८ इच्छुक उमेदवारांनी अर्जाची उचल केली असून, निर्धारित अंतिम तारीख संपुष्टात आल्याने ही प्रक्रिया अधिकृतपणे पूर्ण करण्यात आली आहे. त्यामुळे यापुढे कोणत्याही नव्या इच्छुक उमेदवारांना युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने अर्ज उचलता येणार नसल्याची माहिती पक्षाच्या सूत्रांनी दिली आहे.

अर्ज उचल प्रक्रियेला मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे पक्षात निवडणूक वातावरणात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. युवा स्वाभिमान पार्टीचे अध्यक्ष आ. रवी राणा यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाने संघटनात्मक तयारीला वेग दिला असून, पुढील टप्प्यात उमेदवारांची निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.त्यानुसार दि. १८, १९ आणि २० डिसेंबर रोजी अर्ज उचललेल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या जाणार आहेत. या मुलाखती निवडणूक मुलाखत समितीमार्फत पार पडणार असून, या समितीत राष्ट्रीय अध्यक्ष निळकंठराव कात्रे, मार्गदर्शक सुनीलजी राणा, प्रा. अजयजी गाडे, नंदेशजी अंबाडकर, शैलेंद्रजी कस्तुरे, जयंतराव वानखडे, हरिषजी चरपे, कमलकिशोरजी मालानी, शिवदासजी घुले, संजय हिंगासपुरे, सोनाली नवले, ज्योती सैरिसे, संजय मुनोत, मनोज चांदवानी, प्रा. सतीश खोडे, प्रा. संतोष बनसोड, गंगाधर आवारे, बाळू इंगोले व अवी काळे यांचा समावेश आहे.

या मुलाखतीनंतर युवा स्वाभिमान पार्टीकडून अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर केली जाण्याची शक्यता आहे. महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाने ठोस तयारी सुरू केली असून, शहराचा विकास, युवकांचे प्रश्न आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधा यांना केंद्रस्थानी ठेवून निवडणूक लढवली जाणार असल्याचे पक्षाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# निवडणूक नियोजनाच्या तयारीचा आढावा

## अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची विविध कार्यालयांना भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज दिनांक १७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी शहरातील निवडणूक नियोजनाच्या तयारीचा सविस्तर आढावा घेतला. यासाठी त्यांनी महानगरपालिकेच्या विविध झोन कार्यालयांसह महत्त्वाच्या विभागांना भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली.या पाहणीमध्ये मध्य झोन क्र.२, पूर्व झोन क्र.३, पश्चिम झोन क्र.५, शिक्षण विभाग तसेच जुने तहसील कार्यालय यांचा समावेश होता. प्रत्येक ठिकाणी आयुक्तांनी निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने सुरू असलेल्या तयारीची माहिती घेतली. मतदान केंद्रांची रचना, मतदानासाठी लागणाऱ्या भौतिक सुविधा, मनुष्यबळाचे नियोजन, मतदार याद्यांची अद्ययावत स्थिती तसेच सुरक्षा व प्रशासकीय व्यवस्थेचा त्यांनी सखोल आढावा घेतला.पाहणीदरम्यान आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांशी चर्चा करून निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक, शिस्तबद्ध आणि सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सूचना दिल्या. कोणत्याही प्रकारची त्रुटी राहू नये यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने व वेळेत काम पूर्ण करावे, असे स्पष्ट



निर्देश त्यांनी दिले. तसेच निवडणूक काळात नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याचे आवाहन त्यांनी केले.शिक्षण विभाग व जुने तहसील कार्यालयाच्या पाहणीदरम्यान निवडणुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या खोल्या, साहित्य साठवणूक, अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती तसेच दळणवळण व संपर्क व्यवस्थेबाबतही चर्चा करण्यात आली. आवश्यक ठिकाणी सुधारणा करण्याच्या सूचना देत आयुक्तांनी तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले.या पाहणीदरम्यान संबंधित झोनचे अधिकारी, विभागप्रमुख तसेच कर्मचारी उपस्थित होते. आगामी निवडणुका शांततापूर्ण व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असून, आयुक्तांच्या या पाहणीमुळे निवडणूक तयारीला अधिक गती मिळाल्याचे चित्र आहे.या पाहणी दरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रीमती दुर्गा देवरे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्री प्रसन्नजीत चव्हाण, निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी श्री संतोष काकडे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा वन जमाबंदी अधिकारी श्री विवेकानंद काळकर, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, विधी अधिकारी श्रीकांतसिंह चौहान, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, सहाय्यक आयुक्त मनोज शहाळे, बाजार परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त मंगेश कडू, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रतिभा आत्राम, उपअभियंता प्रमोद इंगोले, विवेक देशमुख, अभियंता हेमंत महाजन, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# गोव्यातील दुर्घटनेनंतरही अमरावतीत फायर सेफ्टी ऑडिटकडे दुर्लक्ष

## हॉटेल-बार-मॉल्सच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ अमरावती-**

गोव्यातील एका क्लबला लागलेल्या भीषण आगीत २७ जणांचा होरपळून मृत्यू झाल्यानंतर राज्यभरात अग्निसुरक्षेबाबत गंभीर चर्चा सुरू झाली आहे. मात्र या पार्श्वभूमीवरही अमरावती जिल्ह्यातील हॉटेल्स, बार, रेस्टॉरंट्स, मोठ्या आस्थापना, दुकाने, रुग्णालये व मॉल्स यांच्या फायर सेफ्टी ऑडिटबाबत मोठे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. ख्रिसमस आणि ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर हॉटेल्स व पर्यटनस्थळांवर मोठी गर्दी होणार असताना, नागरिक व पर्यटकांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.अमरावती जिल्ह्यात चिखलदरा, मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांसारखी निसर्गरम्य पर्यटनस्थळे असल्याने बाहेर जिल्ह्यातून मोठ्या संख्येने पर्यटक येथे येतात. विशेषतः ख्रिसमस आणि नववर्ष स्वागतासाठी ३१ डिसेंबरला शेकडो पर्यटक जिल्ह्यात दाखल होण्याची शक्यता असून, त्यानुसार हॉटेल्स व रिसॉर्ट्सची बुकिंगही आधीच झाली आहेत. अशा परिस्थितीत हॉटेल, बार व रेस्टॉरंट्सचे फायर सेफ्टी ऑडिट करणे अत्यावश्यक



असताना प्रत्यक्षात मात्र बहुतेक आस्थापनांनी ते केलेले नाही.

नियमांनुसार सर्व इमारती, सोसायट्या, व्यावसायिक आस्थापना यांचे फायर सेफ्टी ऑडिट वर्षातून दोन वेळा - जानेवारी व जुलै महिन्यात तज्ज्ञांकडून करून घेणे बंधनकारक आहे. नियमांचे पालन न केल्यास परवाना रद्द करणे, दंडात्मक कारवाई तसेच शिक्षेची तरतूद आहे. अग्निशमन विभागाकडून नोटीस बजावून कारवाईही केली जाऊ शकते.फायर सेफ्टी ऑडिट म्हणजे इमारतीतील आगीचे संभाव्य धोके, अग्निसुरक्षा यंत्रणा जसे की फायर अलार्म, अग्निशामक, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग आणि आपत्ती व्यवस्थापनाची तयारी यांची सखोल तपासणी व मूल्यांकन प्रक्रिया होय. या प्रक्रियेमुळे धोके ओळखून अपघात टाळता येतात तसेच जीवित व वित्तहानीपासून संरक्षण मिळते.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील आस्थापनांपैकी केवळ सुमारे १० टक्के आस्थापनांनीच फायर ऑडिट केले असल्याची माहिती अग्निशमन विभागाकडून देण्यात आली आहे. उर्वरित मोठ्या प्रमाणावर आस्थापनांचे फायर ऑडिट झालेले नाही. विशेष म्हणजे एकाही बियर बारने फायर ऑडिट केलेले नसल्याचेही समोर आले आहे. जिल्ह्यात वर्षभरात १५ हून अधिक आगीच्या घटना घडल्या असून, जरी हॉटेल्स व रिसॉर्ट्समधील आगीचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी केवळ १० हॉटेल्सनीच फायर ऑडिट केले आहे.

वर्षातून दोनदा फायर ऑडिट करणे बंधनकारक असतानाही अनेक बार, रेस्टॉरंट व हॉटेल व्यावसायिक याकडे कानाडोळा करत असल्याचे चित्र आहे. गोव्यातील दुर्घटनेतून धडा घेत प्रशासनाने तातडीने तपासणी मोहीम राबवून नियमांची सक्ती करावी, अशी मागणी नागरिक व सामाजिक संघटनांकडून केली जात आहे. अन्यथा गर्दीच्या सणासुदीच्या काळात एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल उपस्थित होत आहे.-

# कौंडण्यपूर येथे बोटचालकांपासून पैसे घेणाऱ्या निम्न वर्धा प्रकल्पाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

भगवान श्रीकृष्णाचे सासर व विदर्भ राजकन्या श्री रुख्मिणी मातेचे तसेच पंचसतीचे माहेरघर असलेल्या श्री क्षेत्र कौंडण्यपूर नदीपात्रात भोई समाजबांधव कित्येक दिवसांपासून उदरनिर्वाह म्हणून प्रवाशी बोट चालवीत असून गतकाळात गणपती, दुर्गोत्सव काळात कुठलाही अनुचित प्रकार घडल्यास सुरक्षेची जबाबदारी त्यांनी पार पाडली आहे. अनेक वेळा नदीमध्ये बुडत असलेल्या भक्तांचे प्राण सुद्धा त्यांनी वाचविले असून, पोलीस प्रशासनाला मय्यत व्यक्ती शोधण्यासाठी सुद्धा अनेकदा त्यांनी मदत केली आहे. विशेष म्हणजे त्यांच्या बोट या सुरक्षित असून यामध्ये प्रवाशांना कुठलीही भीती नाही. असे असताना, दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी दुपारच्या दरम्यान निम्न वर्धा प्रकल्पाचे उपकार्यकारी अभियंता श्री. डांगे हे आपल्या टीमसह कौडण्यपूर नदीघाटावर येऊन त्यांनी श्री जानरावजी केवदे, श्री सुधाकरराव केवदे, श्री प्रल्हादराव केवदे यांच्या प्रवाशी बोट बंद करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी बोटचालकांनी त्यांना यासबंधीत आम्ही प्रशासनाकडे बोट चालविण्याची परवानगी सुद्धा मागितली आहे, सदर प्रवाशी बोटचा व्यवसाय हा आमचा उदरनिर्वाह असल्याचे सांगून बोट चालवू द्यावी, अशी विनंती सुद्धा केली. तरीसुद्धा निम्न वर्धा प्रकल्पाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बोट बंद करण्याच्या फक्त तोंडी सूचना दिल्या, व



याबाबत कुठलीही लेखी नोटीस त्यांना दिली नाही. त्यानंतर उपकार्यकारी अभियंता श्री डांगे हे समोर निघून गेल्यानंतर त्यांच्या टीम मध्ये असलेले श्री हर्षद मेश्राम (कनिष्ठ अभियंता, निम्न वर्धा प्रकल्प) यांनी १५,००० रुपयांची मागणी केली. यावेळी बोट चालकांना भीती निर्माण झाली आणि त्यांनी सर्व मिळून त्यांना १२,००० हजार रुपये त्यांना दिले. याबाबत त्यांनी कुठलीही पावती बोट चालकांना दिली नाही. तसेच लेखी नोटीस सुद्धा दिली नाही. ही सर्व तक्रार घेऊन बोट चालकांनी कौंडण्यपूर विकासासाठी सातत्याने तत्पर असलेले भाजप जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या यांच्याकडे धाव घेतली, व घडलेला सर्व प्रकार पुराव्यानिशी त्यांच्यासमोर मांडला. तसेच सदर प्रकाराची लेखी तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सुद्धा केली. त्यानंतर जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांनी सदर प्रकार हा गंभीर असून निम्न वर्धा प्रकल्पाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा हा प्रताप दिनांक १५ डिसेंबर रोजी अमरावती दौऱ्यावर असलेले पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासमक्ष मांडला. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सदर प्रकाराची तात्काळ दखल घेत कारवाई चे आदेश दिले. आणि बोटचालकांना प्रवाशी बोट चालविण्याची परवानगी देण्याचे सुद्धा आदेश संबंधितांना दिले. यावेळी रविराज देशमुख यांनी पालकमंत्री महोदयांचे आभार मानले.

# महाराष्ट्रातील थंडीची लाट ओसरली पण गारठा कायम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

डिसेंबर महिना संपण्यास आता १२ ते १३ दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे आता राज्यातील अनेक भागांत गारठा वाढण्यास सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक कमी तापमानाची नोंद ही धुळे जिल्ह्यात करण्यात आली आहे. धुळ्यात सध्या हाडं गोठवणारी थंडी पडली असून नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यातील थंडीची लाट हळूहळू कमी होऊ



लागलेली आहे, पण गारठा अद्यापही जाणवत आहे. रात्रीच्या वेळी आणि पहाटेच्या वेळी वातावरणात गारठा जाणवत असून दुपारी मात्र उन्हाच्या झळा अंगाला टोचच आहेत. एकीकडे गारठा असताना दुसरीकडे हवेतील प्रदुषणामुळे नागरिक हैराण झाले आहेत. परंतु, उत्तरेकडील राज्यांना हवामान विभागाकडून सतर्कतेचा इशारा देणारा आहे. पुढील काही दिवसांमध्ये उत्तरेतील अनेक राज्यांच्या तापमानात घट होणार असल्याने येथील नागरिकांना सतर्कतेचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. परंतु, महाराष्ट्रात पुढील काही दिवस तापमानात फारसा काही परिणाम होताना पाहायला मिळणार नसल्याची माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली आहे.

# इंस्टाग्रामवर शस्त्रासह फोटो व्हायरल करून दहशत पसरवणारा तरुण गुन्हे शाखेच्या ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१८ अमरावती**

अमरावती शहर गुन्हे शाखेच्या पथकाने सोशल मीडियावर शस्त्रासह फोटो अपलोड करून दहशत पसरवणाऱ्या एका इसमास घातक शस्त्रासह ताब्यात घेऊन प्रभावी कारवाई केली आहे. गुन्हे शाखेस गुप्त माहिती मिळाली होती की, एक इसम गेल्या काही दिवसांपासून शस्त्रासह इंस्टाग्रामवर फोटो अपलोड करून ते सोशल मीडियावर प्रसारित करीत असून त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार सदर इसम जेवड नगर, अमरावती येथे शस्त्रासह उभा असल्याचे कळताच, पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने तत्काळ सापळा रचून अभिषेक उध्दव मेश्राम (वय २४ वर्षे, रा. जेवड नगर, अमरावती) यास ताब्यात




घेतले.झडतीदरम्यान त्याच्या ताब्यातून एक चायना चाकू जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन राजापेठ येथे आर्म्स ॲक्ट कलम ४/२५ तसेच म.पो.का. कलम १३५ अन्वये गुन्हा नोंदवून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.सोशल मीडियाचा गैरवापर करून शस्त्रप्रदर्शनाद्वारे दहशत निर्माण करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा अमरावती शहर गुन्हे शाखेकडून देण्यात आला आहे.सदर ची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला साहेब, अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे साहेब, पोलीस उपायुक्त श्याम घुगे साहेब, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ साहेब, शिवाजी बचाटे साहेब, सपोआ गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि महेश इंगोले, पोलीस अंमलदार - गजानन ढेवले, मनोज ठोसर, मंगेश परिमल, संदिप खंडारे, नईम बेग, विकास गुडदे, सागर ठाकरे, योगेश पवार यांनी केली आहे.

# सुफी नगर, वलगाव येथे कत्तलीसाठी गोठ्यात बांधून ठेवलेल्या २६ गोवंशाची गुन्हे शाखेकडून सुटका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती-**


अमरावती शहर गुन्हे शाखेच्या पथकाने सुफी नगर, वलगाव येथे कत्तलीसाठी निर्दयतेने गोठ्यात बांधून ठेवलेल्या २६ गोवंशाची सुटका केली आहे. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे यांच्या पथकाने पंचांसह छापा टाकून ही कारवाई केली.छाप्यात मोहमद साकीब मोहमद जाकीर (वय २१, रा. कसाबपूरा, पो.स्टे. वलगाव, जि. अमरावती) यांच्या गोठ्यात एकूण २६ गोवंश (गायी, बैल,



कालवडी व गोरे) आढळून आले. प्रत्येकी अंदाजे २० हजार रुपये किमतीनुसार एकूण सुमारे ५ लाख २० हजार रुपयांचे गोवंश जप्त करण्यात आले. आरोपीकडे गोवंशाच्या मालकी हक्काची कोणतीही कागदपत्रे नसल्याने हे गोवंश कत्तलीसाठी निर्दयतेने बांधून ठेवण्यात आल्याचे स्पष्ट झाले.या प्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ अंतर्गत कलम ५ (अ)(ब) तसेच प्राण्यांना निर्दयतेने वागवण्याचा प्रतिबंध अधिनियम अंतर्गत कलम ११ (१)(क) अन्वये वलगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सुटका करण्यात आलेले गोवंश गोरक्षण संस्था, दस्तुर नगर येथे संरक्षण व संवर्धनासाठी सुपूर्द करण्यात आले आहेत. आरोपीस पुढील तपासासाठी वलगाव पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय व गुन्हे) रमेश धुमाळ व सपोआ शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सपोनि मनीष वाकोडे यांच्यासह पोलीस अंमलदार सतीश देशमुख, फिरोज खान, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, सैयद नाझिमुद्दीन, रणजित गावंडे व चालक प्रभात पोकळे सहभागी होते.

# रेशनकार्ड धारकांच्या उत्पन्नाची होणार छाननी

## जिल्हाभरात पुरवठा विभागाने शोधमोहीम केली सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

स्वस्तधान्य दुकानातून धान्याची उचल करणाऱ्या शिधापत्रिकाधारकांच्या वार्षिक उत्पन्नाची तपासणी करण्यासाठी जिल्ह्यात व्यापक शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. पात्रतेच्या निकषात न बसणाऱ्या लाभार्थींवर कारवाई करण्यात येणार आहे. अपात्र शिधापत्रिका रद्द होण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक रेशनकार्डधारक कुटुंबीयांने आतापर्यंत किती वेळा धान्याची उचल केली, त्यांचे वार्षिक उत्पन्न किती आहे, याची सखोल पडताळणी केली जात आहे. यासाठी सर्व कुटुंबांकडून उत्पन्नाचा दाखला घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या तपासणीनंतर शिधापत्रिका पात्र की अपात्र, याचा अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. स्वस्त धान्य दुकानातून विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून धान्याचे वितरण केले जाते. मात्र, काही आर्थिकदृष्ट्या सक्षम लाभार्थींनीही शिधापत्रिकांचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे रेशन दुकानांवरील कार्डांची संख्या वाढली असून, धान्याचा कोटाही वाढवावा लागत आहे. ही बाब लक्षात घेता, आता धान्याची उचल करणारे प्रत्येक कुटुंब खरोखरच पात्र आहे का, याची तपासणी सुरू करण्यात आली आहे. ही शोधमोहीम प्रत्येक तहसील स्तरावर राबवण्यात येणार आहे.

गावपातळीवर शिधापत्रिकाधारकांची तपासणी केली जाणार आहे. तहसीलदारांच्या माध्यमातून संबंधित कुटुंबांना अर्ज देण्यात आले असून, त्यासोबत उत्पन्नाचा दाखला व आधार कार्ड जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. संपूर्ण प्रक्रियेची तपासणी करून त्यानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे.

शिधापत्रिकांची व्यापक पडताळणी अपात्र शिधापत्रिका शोधमोहिमेत जिल्ह्यातील अंत्योदय योजनेतील सर्व कार्डधारकांची तपासणी केली जाणार आहे. याचा सविस्तर अहवाल प्रथम तालुकास्तरावर व त्यानंतर जिल्हास्तरावर पाठवला जाणार आहे. या कारवाईमुळे अपात्र लाभार्थ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# अमरावती महापालिकेत ६.७७ लाख मतदार ७९७ मतदान केंद्र, ३६०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

महानगरपालिकेच्या ८७ जागेसाठी १५ जानेवारीला मतदान होणार आहे. त्याची तयारी सुरू झाली असून ६ लाखा ७७ हजार १८० मतदार आपल्या मतदानाचा हक्क निवडणुकीत बजावणार आहे. एकूण ७९७ मतदान केंद्र गठीत करण्यात आले आहे. लवकरच केंद्रनिहाय याद्या जाहीर होईल. ३६०० कर्मचार्यांची नियुक्ती होणार असल्याची माहिती आयुक्त सौम्या शर्मा यांनी दिली.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक १ जुलै २०२५ या दिवशी अस्तित्वात असलेली संबंधीत विधानसभेची मतदार यादी प्रभाग क्र. १ ते २२ मध्ये विभागून प्रारुप मतदार यादी तयार करण्यात आली होती. या प्रारुप मतदार यादीवर २० ऑक्टोबर ते ३ डिसेंबर दरम्यान हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्या निकाली काढून प्रभाग निहाय अंतिम मतदार याद्या १५ डिसेंबरला प्रसिद्ध झाल्या आहे. या याद्या क्षेत्रीय झोन कार्यालयात तसेच अमरावती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.



महापालिका निवडणुकीकरीता ७ निवडणूक निर्णय अधिकार्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचे ७ ठिकाणी वेगवेगळे कार्यालये राहणार आहे. पहिले कार्यालय उत्तर झोन क्र.१ रामपुरी कॅम्प अंतर्गत प्रभाग क्र.१, २, ५, दुसरे कार्यालय नवीन तहसील येथे राहणार असून प्रभाग क्र.३, ४, ७, तिसरे कार्यालय मध्य झोन क्र.२ राजापेठ येथे प्रभाग क्र.११, १२, १८, चौथे कार्यालय पूर्व झोन क्र.३ दस्तुरनगर येथे प्रभाग क्र.८, ९, १०, पाचवे कार्यालय महानगरपालिका शिक्षण विभाग अंबापेठ येथे राहणार असून प्रभाग क्र. ६, १३, १७, सहावे कार्यालय पश्चिम झोन क्र.५ जुने तहसील येथे राहील, प्रभाग क्र. १४, १५, १६, सातवे कार्यालय दक्षिण झोन क्र. ४ बडनेरा येथे राहणार असून त्या अंतर्गत प्रभाग क्र.१९, २०, २१, २२ आहे. जे प्रभाग ज्या निवडणूक निर्णय अधिकार्याच्या कार्यालया अंतर्गत येतात तेथेच त्या प्रभागातल्या उमेदवारांना अर्ज सादर करावा लागणार आहे.

उमेदवारला ९ लाख खर्च करण्याची मर्यादा आहे. आदर्श आचारसंहीतेचे पालन काटेकोर व्हावे, यासाठी व अन्य कामासाठी विविध समिती अंतिम मतदार यादीनूसार अमरावती महानगरपालिकेसाठी एकूण मतदार ६ लाख ७७ हजार ,१८० असून त्यापैकी स्त्री मतदार ३ लाख ३७ हजार ९३५ तर पुरुष मतदार ३ लाख ३९ हजार १७७ व इतर ६८ असे मतदार आहेत. मतदार यादीतील नाव शोधण्याकरीता राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळवार उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या संकेतस्थळवर भेट देऊन मतदार आपले नांव कोणत्या प्रभागात समाविष्ट आहे याची माहिती घेऊ शकतात. १५ जानेवारीला सकाळी ७.३० ते सांयकाळी ५.३० मतदान होईल. मतमोजणी १६ जानेवारीला सकाळी ८.३० वाजतापासून स्पोर्ट कॉम्प्लेक्स, नवसारी येथे होणार आहे.

# २० गुंठ्यांत सेंद्रिय शेती; १५०० रु. कमाई

## शिक्षण परिषदेत ठरला विशेष आकर्षण, विद्यार्थीच करतात भाज्यांची विक्री



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अंजनगाव सुर्जी**

तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा चिंचोना येथील विद्यार्थ्यांनी सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी २० गुंठ्यांवर परसबाग फुलवली. यात लावलेल्या भाजा पाल्यापासून विद्यार्थी शाळेला दिवसाकाठी १५०० रुपयांची कमाई करून देत आहेत. विद्यार्थ्यांच्या सहभागातून हा सेंद्रिय भाजीपाला बाजार हा शिकत-शिकत कमवा या संकल्पनेचा उत्तम नमुना ठरला असून इतर शाळांसाठीही तो प्रेरणादायी ठरत आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेतीचे महत्त्व, व्यवहारज्ञान, आर्थिक साक्षरता होत आहे.

६० शिक्षकांकडून भाजीपाला खरेदी शिक्षण परिषदेला उपस्थित असलेल्या ६० शिक्षकांनी या बाजारातून खरेदी केली. कमी दरात भाजीपाला व फळे उपलब्ध करून दिल्यानंतरही या उपक्रमातून शाळेला सुमारे १२०० ते १५०० रुपये उत्पन्न प्राप्त झाले.हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अनुभवाधारित शिक्षण देणारा तसेच सेंद्रिय शेतीबाबत जागृती निर्माण करणारा ठरला. सुभाष वानखडे, मुख्याध्यापक, चिंचोना.

सेंद्रिय शेतीला चालना देण्याचा लक्षवेधी प्रयोग शिक्षण परिषदेसाठी आलेल्या शिक्षकांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचे व कौशल्याचे विशेष कौतुक केले.विद्यार्थ्यांच् या सहभागातून भरवलेला हा सेंद्रिय भाजीपाला बाजार हा केवळ विक्रीपुरता मर्यादित न राहता शिकत-शिकत कमवा या संकल्पनेचा उत्तम नमुना ठरला असून इतर शाळांसाठीही तो प्रेरणादायी ठरत आहे.

# अवैध धंदे करणाऱ्यांची पोलिसांनी घेतला क्लास

## भातकुली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ॲक्शन मोडवर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १८ भातकुली**

भातकुली पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध धंदे करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. महानगरपालिका निवडणुका जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर भातकुली पोलीस स्टेशनने सतर्कता वाढवली असून, सातत्याने धडक कारवाया सुरू केल्या आहेत. भातकुली पोलीस स्टेशन हा जरी थेट महानगरपालिका हद्दीत नसला, तरी तो अमरावती पोलीस आयुक्तालयाच्या अखत्यारीत येतो.भातकुली पोलीस स्टेशन अंतर्गत सुरू असलेल्या अवैध दारूविक्री, जुगार, वरली-मटका आदी गैरकायदेशीर धंद्यांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींना पोलीस ठाण्यात बोलावून समज देण्यात आली. यावेळी पोलीस निरीक्षक रवींद्र राजुलवार यांनी संबंधितांना स्पष्ट इशारा देत, मौखिक समज देऊनही पुन्हा अवैध दारू, जुगार किंवा वरली-मटका करताना आढळल्यास कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल, असे ठणकावून सांगितले.निवडणुकीच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांचा हा कडक पवित्रा असून, भातकुली परिसरात अवैध धंदे पूर्णपणे बंद करण्यासाठी पुढील काळातही तपासणी व कारवाया तीव्र केल्या जाणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# आंतरराज्यीय टोळीतील आरोपी गजाआड

## १६.५३ लाखाची आभासी फसवणूक -जामतारात येथून घेतले ताब्यात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

भारतातील बहुतांश सायबर गुन्हे झारखंडमधील जामताराशी संबंधित असतात. येथून सायबर गुन्हेगारांना अटक करणे अवघड असते. भौगोलिक स्थितीचा फायदा घेत गुन्हेगार हे पोलिसांच्या कारवाईच्या आधीच पळून जाण्यात यशस्वी ठरतात. पण, अमरावती पोलिसांच्या एक पथकाने जामतारा येथे पोहोचून आंतरराज्यीय टोळीतील सायबर गुन्हेगाराला ताब्यात घेण्यात यश मिळवले आहे.

येथील एका ऑईल मिल मालकाच्या व्हॉट्सॲपवर पाण्याचे कनेक्शन कापले जाणार आहे, असा संदेश ९ नोव्हेंबर रोजी पाठवण्यात आला होता. संदेश उघडताच 'एपीके फाईल लिंक'द्वारे त्यांचा मोबाईल हॅक करण्यात आला आणि त्यांच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यातून १६.५३ लाख रुपयांची रक्कम काढून घेण्यात आली. या प्रकरणी तक्रारीच्या आधारे सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला. या ऑनलाईन फसवणूक प्रकरणाच्या तपासाचे मोठे आव्हान सायबर पोलिसांसमोर होते. फसवणुकीतील काही रक्कम ही क्रेडिट कार्डमध्ये पाठवण्यात आल्याचे निदर्शनास आले आणि या गुन्ह्यात एकापेक्षा अधिक जण सहभागी असल्याचेही तपासादरम्यान दिसून आले.

ऑईल मिल मालकाच्या बँक खात्यातून झालेल्या एकूण ९ व्यवहारांपैकी २ व्यवहारातील १.४५ लाख आणि १.२० लाख रुपये क्रेडिट कार्डद्वारे काढण्यात आल्याचे तपासात उघड झाले. या क्रेडिट कार्डचे तपशील विविध दलालांमार्फत आरोपी मृणाल उर्फ विक्रम पांडे याच्यापर्यंत पोहवण्यात आले. त्यानंतर आरोपी मृणाल पांडे याने १२ नोव्हेंबरलाा या क्रेडिट कार्ड तपशीलांचा वापर करून फसवणुकीच्या रकमेचे व्यवहार केले. तांत्रिक विश्लेषणाच्या माध्यमातून आरोपी हा झारखंडमधील जामतारा जिल्ह्यातील हरिराखा येथे राहणारा असल्याचे निष्पन्न झाले.

सहायक पोलिस निरीक्षक अनिकेत कासार, हेड कॉन्स्टेबल विशाल, रोशन अनिकेत आणि अश्विन यांचे पथक तपासासाठी झारखंडमध्ये पोहोचले. त्यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या सहाय्याने आरोपीचा शोध घेतला. शिताफीने आरोपी मृणाल पांडे याला डुंबरिया चौक, जामतारा येथून ताब्यात घेण्यात आले. त्याच्या घराची झडती घेण्यात आली. त्यात १० क्रेडिट आणि डेबिट कार्ड, २ पासबुक, २ चेकबुक, काही आधार कार्डच्या झेरॉक्स, २ मोबाईल फोन आणि रोख १४ हजार ५०० रुपये जप्त करण्यात आले. इतर आरोपींचा शोध सुरू करण्यात आला आहे.

# अमरावती शिक्षक मतदार संघाची प्रारुप यादी प्रसिद्ध

## मतदार संकेतस्थळावर आपले नाव शोधू शकतात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

भारत निवडणूक आयोगाने विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदार संघासाठीची प्रारुप मतदार यादी घोषित केली आहे. या यादीत मतदारांना आपले नाव सहजतेने शोधता यावे यासाठी प्रशासनाने एक संकेतस्थळ उपलब्ध करून दिले आहे.

ही प्रारुप मतदार यादी संबंधित मतदारांच्या माहितीसाठी विभागीय आयुक्त कार्यालय आणि विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित असून, प्राप्त झालेल्या अर्जांवरून ती तयार करण्यात आली आहे.

मतदारांना ऑनलाइन पद्धतीने आपले नाव शोधता यावे यासाठी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत अधिकृत संकेतस्थळ देण्यात आले आहे. हे संकेतस्थळ https://ceoelection.maharashtra.gov.in/ConstituencyRolls/TandGElectoralRollsSimple.aspx असे आहे.

उप जिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी अमरावती विभागातील सर्व पात्र शिक्षकांना या प्रारुप यादीमध्ये आपले नाव असल्याची खात्री करण्याचे आवाहन केले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निवडणूक शाखेशी संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी केले.

# तिवसा तालुक्यात सीईओ संजिता महापात्र यांचा दौरा : विद्यार्थ्यांसोबत घेतला शालेय पोषण आहार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८तिवसा**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन अधिकारी संजिता महापात्र यांनी बुधवारी तिवसा तालुक्याचा दौरा केला. यावेळी त्यांनी सालोरा बु. गावाला भेट देत ग्रामपंचायत व जिल्हा परिषद शाळेच्या कामकाजाचा आढावा घेतला. शाळेत भेट दिल्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांची शैक्षणिक गुणवत्ता तपासली. तसेच विद्यार्थ्यांसोबत बसून शालेय पोषण आहाराची चव चाखत आहाराच्या दर्जाची प्रत्यक्ष पाहणी केली.

या प्रसंगी गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे, सरपंच ममता जाधव, उपसरपंच निता धाकडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायतीमार्फत गावांतर्गत करण्यात आलेल्या विविध विकासकामांची सीईओंनी पाहणी केली. यामध्ये वनराई बंधारा, स्मशानभूमी विकास, वृक्षलागवड आदी कामांचा समावेश होता.दौऱ्यादरम्यान दिव्यांग बांधवांना ब्लँकेटचे वितरण करण्यात आले. तसेच अन्य लाभार्थ्यांना आयुष्मान भारत आरोग्य कार्डचे वाटप करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या डिजिटल उपक्रमांना चालना देत ग्रामपंचायतीच्या संकेतस्थळाचे उद्घाटनही सीईओंच्या हस्ते करण्यात आले.यानंतर संजिता महापात्र यांनी करजगाव येथील ग्रामपंचायतीला भेट देऊन तेथील विकासकामे, योजनांची अंमलबजावणी व प्रशासनिक बाबींचा सविस्तर आढावा घेतला. ग्रामपंचायतींनी शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांना अधिकाधिक लाभ द्यावा, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

# रा. स्व. संघाच्या सेवाकार्यात सहभागी व्हा - प्रांत संघचालक तामशेट्टीवार

## आरोग्यदूत चलचिकित्सालयाचे लोकार्पण - डॉ. हेडगेवार सेवा समितीचा सेवा प्रकल्प



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि ८धारणी**

डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समितीद्वारे व हरिगोविंद छात्रावासाच्या माध्यमाने मेळघाटातील दुर्गम क्षेत्रात प्राथमिक उपचार पोहोचविण्यासाठी आरोग्यदूत नावाचे चलचिकित्सालय १६ डिसेंबर रोजी जनतेच्या सेवेत दाखल झाले. याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधिकारी डॉ. पंकज सातनकर उपस्थित होते. विचारमंचावर सेवा समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर राठी, तालुका संघचालक दिलीप सेईवाल व अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते रमेश मालवीय आणि रामदास जैस्वाल विराजमान होते. स्वागत आरोग्यदूत प्रमुख डॉ. कमलकिशोर परिहार व छात्रावास समितीचे जयप्रकाश नवलाखे यांनी केले.

१६ डिसेंबर रोजी स्व. शंकरलाल सत्यवादी यांच्याकडून फिरत्या दवाखाण्यासाठी ३० लाखाच्या किंमतीची रुग्णवाहिका व चिकित्सालयाची गाडी मेळघाटच्या सेवेत दाखल झाली. संत जाटू बाबांच्या समाधीचे दर्शन करुन प्रथम वैद्यकीय सेवा बोड मंदिरावर देण्यात आली. ४० रुग्णांची तपासणी करण्यात आली. तत्पूर्वी धारणी येथील हरिगोविंद छात्रावासाच्या प्रांगणात कार्यक्रम झाला. त्यावेळी डॉ. सातनकर यांनी मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू व मातामृत्युचे वास्तव मांडले. आरोग्यदूत उपक्रमाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. मेळघाटात उपचार व्यवस्थेतील व्यसनमुक्ती अभियानाची गरज असून कॅन्सरमुळे पण जास्त मृत्यू होत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक दीपक भागवत, संचालन लोकेश धनेवार व आभार रतनलाल परिहार यांनी मानले. कार्यक्रमात केदार जोशी, सुनील कथले, रमेश नांदुरकर, हेमंत जैस्वाल, नितेश चरपे, अशोक केदार, जगदीश व अशोक गुप्ता, संदीप व सुशील गुप्ता, डॉ. चंद्रविजय अनासाने, रवि नवलाखे, रसिक पटेल, किशोर नवलाखे, अॅड. धर्मेंद्र सोनी, बंटी जोशी, आप्पा पाटील, डॉ. क्षीरसागर, कमलेश शेलेकर, जतीन पुरोहित, नंदू भिलावेकर, गजू सुडस्कर, सतीश राठौड उपस्थित होते.

# काँग्रेस भवन येथे इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीदरम्यान जोरदार शक्तीप्रदर्शन

## 'वारे पंजा आया रे पंजा' समर्थकांच्या घोषणांनी परिसर दणाणला





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकीचा बिगुल वाजताच सर्वच राजकीय पक्ष सक्रिय झाले असून उमेदवार निवडीसाठी इच्छुकांच्या मुलाखती सुरू झाल्या आहेत. अमरावती शहरात भाजपच्या मुलाखतीनंतर आता अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने १८ डिसेंबरपासून काँग्रेस भवन येथे इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींना सुरुवात करण्यात आली आहे.

या मुलाखतीदरम्यान काँग्रेस भवन परिसरात इच्छुक उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत आपली ताकद दाखवली. काँग्रेस पक्षाचे ध्वज हातात घेऊन शेकडो समर्थकांनी 'वारे पंजा आया रे पंजा', 'काँग्रेस जिंदाबाद' अशा जोरदार घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

अमरावती शहरातील २२ प्रभागांतून काँग्रेस पदाधिकारी व इच्छुक उमेदवारांनी पक्षाकडे उमेदवारीची मागणी करत मुलाखती दिल्या. प्रत्येक प्रभागातून मोठ्या संख्येने समर्थक उपस्थित असल्याने काँग्रेस भवन येथे उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.या वेळी काँग्रेस नेत्या ड. यशोमती ठाकूर, माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख, खासदार बळवंत वानखडे, काँग्रेस प्रवक्ता दिलीप एडतकर, शहर अध्यक्ष बबलू शेखावत, प्रदेश पदाधिकारी किशोर बोरकर, भैय्या पवार, महिला काँग्रेस अध्यक्ष जयश्री वानखडे यांच्यासह अनेक वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

**अमरावतीचा महापौर काँग्रेसचाच होणार**

मुलाखतीदरम्यान बोलताना डॉ. सुनील देशमुख यांनी, येत्या महानगरपालिका निवडणुकीत अमरावतीचा महापौर काँग्रेसचाच होणार, असा ठाम विश्वास व्यक्त केला. काँग्रेस पक्ष संघटनात्मकदृष्ट्या मजबूत असून जनतेचा विश्वास पक्षासोबत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# जिल्हा परिषद निवडणूक जाहीर होण्याआधीच इच्छुकांचा नवा फंडा

## मतदारांसाठी देवदर्शन-पर्यटन यात्रांचा ट्रेंड

### दर्शनयात्रा नवा ट्रेंड




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचा निर्णय अद्याप प्रलंबित असल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. निवडणूक कधी जाहीर होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले असतानाच अनेक इच्छुकांनी पारंपरिक प्रचाराला फाटा देत निवडणुकीचा नवा ट्रेंड सुरू केला आहे. मतदारांना थेट देवदर्शन व पर्यटन यात्रांना नेण्याचा फंडा सध्या जिल्हा परिषद गटांमध्ये चांगलाच चर्चेत आला आहे.

निवडणुका लांबत चालल्याने अनेक मध्यम आर्थिक क्षमतेच्या इच्छुक उमेदवारांचे खर्च वाढत असून, प्रचारासाठी केलेल्या खर्चामुळे त्यांचे कंबरडे मोडत आहे. मात्र, आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या उमेदवारांनी या परिस्थितीचा वेगळ्याच पद्धतीने फायदा घेतला आहे. निवडणूक कितीही लांबली तरी खर्चाची तमा न बाळगता त्यांनी मतदारांशी जवळीक वाढविण्यासाठी दर्शनयात्रांचा मार्ग अवलंबला आहे. परिणामी, जिल्हा परिषद मतदारसंघांमध्ये सध्या निवडणूक प्रचार कमी आणि दर्शनयात्रा अधिक दिसून येत आहेत.इच्छुक उमेदवार गटातील महिलांसह पुरुष मतदारांना शेगाव, शिर्डी, नाशिक-त्र्यंबकेश्वर, तुळजापूर येथील तुळजाभवानी, कोल्हापूर, अंबादेवी तसेच वणीच्या सप्तश्रृंगी देवी अशा विविध तीर्थक्षेत्रांच्या दर्शनासाठी घेऊन जात आहेत. काही ठिकाणी पर्यटनाची जोड देत ही यात्रा अधिक आकर्षक करण्यात येत आहे. निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच गटातील गावांचे मतदार या दर्शनयात्रांचा लाभ घेत असल्याने सध्या संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले आहे.

मतदारांना दर्शनासाठी नेण्यासाठी बहुतांश इच्छुकांनी रेल्वेचा पर्याय निवडला आहे. महिलांना लालपरीत अर्ध्या तिकिटात प्रवास करता येत असल्याने खर्चही तुलनेने कमी पडतो. त्यामुळे इच्छुक उमेदवारांसाठी हा प्रचाराचा स्वस्त आणि प्रभावी मार्ग ठरत आहे. आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी हे सर्व पर्याय इच्छुकांकडून वापरले जात आहेत.दरम्यान, निवडणुका एप्रिल किंवा मे महिन्यात झाल्यास खर्च किती वाढेल, याचीही चिंता इच्छुकांना सतावत आहे. त्यामुळे अनेकांना आता लवकरात लवकर निवडणुका जाहीर व्हाव्यात, असे वाटू लागले आहे. आयोगाकडून तयारी झाली असली तरी निवडणूक जाहीर न झाल्याने इच्छुकांची धाकधूक कायम असून, तोपर्यंत दर्शनयात्रांचाच ट्रेंड सुरू राहणार, असे चित्र आहे.

# आनंदवाडी कॅनॉलमध्ये २१ वर्षीय तरुण वाहून गेला

## वडिलांसमोरच घडली दुर्घटना रेस्क्यू टीमकडून शोधकार्य सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८तिवसा**

आनंदवाडी परिसरातील कॅनॉलमध्ये २१ वर्षीय तरुण वडिलांच्या डोळ्यादेखत वाहून गेल्याची धक्कादायक घटना मंगळवारी दुपारी साडेअकराच्या सुमारास घडली. ओम अरविंद सहारे (रा. अमरावती) असे वाहून गेलेल्या तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ओम हा कॅनॉलजवळ पाय धुण्यासाठी गेला असताना अचानक पाय घसरून तो प्रवाहात पडला. पाण्याचा वेग अधिक असल्याने काही क्षणातच तो कॅनॉलच्या प्रवाहात वाहून गेला. ही संपूर्ण घटना वडिलांच्या समोरच घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.घटनेची माहिती तात्काळ तिवसा तहसीलदार, तिवसा पोलीस ठाणे, अप्पर वर्धा प्रशासन तसेच रेस्क्यू टीम यांना देण्यात आली आहे. माहिती मिळताच संबंधित यंत्रणा घटनास्थळी रवाना झाली असून शोधकार्य लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.दरम्यान, घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून कॅनॉल परिसरात सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# उमेद पंख विश्वासाचे उपक्रमाचा थाटात शुभारंभ

## जयपुर फुट वाटपाच्या विक्रमी कार्यक्रमात दिव्यांगाची मोठी गर्दी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती निमित्ताने उमेद पंख विश्वासाचे या उपक्रमास थाटात सुरुवात झाली असून विनामूल्य जयपुर फूट मिळवण्यासाठी दिव्यांग बांधव भगिनींनी आज मोठी गर्दी केली.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विशेष पुढाकारातून डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, आर्किटेक रामेश्वर मनियार,अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १८ डिसेंबर पासून विनामूल्य जयपूर फूट कृत्रिम अवयव (अंगरोपण) वाटपाचा कार्यक्रम डॉ.पंजाबराव देशमुख स्मृति वैद्यकीय महाविद्यालय पंचवटी येथे आयोजित करण्यात आला आहे. कृत्रिम अवयव मिळविण्यासाठी व मोजमाप देण्यासाठी ८०० दिव्यांग बांधवांनी नोंदणी केली आहे. या उपक्रमाचे बापूसाहेब देशमुख नागरवाडी यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन झाले. या उपक्रमाचा उद्घाटन सोहळा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षखाली संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आ.प्रवीण तायडे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, संस्थेचे उपाध्यक्ष भैय्यासाहेब पाटील पुसदेकर, कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, प्रा.सुभाषराव बनसोड प्राचार्य अंबादास कुलट,प्राचार्य अमोल महल्ले आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कलाकार रजनी अंबादे, संदीपजी पुंडकर, प्रभुजितसिंह बच्छर, संत गाडगेबाबा धर्मशाळा ट्रस्ट दादरचे विश्वस्त प्रशांतराव देशमुख,भरतराव रेडे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, किशोर मालोकर रामेश्वर मनियार यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणातून हर्षवर्धन देशमुख यांनी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविले जावे अशी इच्छा व्यक्त करून लोक कल्याणाची संधी मिळाली तर जेवढे देता येईल तेवढे देण्याचा प्रयत्न करावा चांगल्या योजनेसाठी आम्ही सदैव सहकार्य करत राहू असे आश्वासन दिले. तसेच हेमंत काळमेघ यांनी हा कार्यक्रम घडवून आणण्यासाठी विशेष परिश्रम घेतले त्यामुळे ते देखील कौतुकास पात्र असल्याचे हर्षवर्धन देशमुख यांनी सांगितले.यावेळी मुख्य कार्यपालन अधिकारी संजिता महापात्र, यांनी दिव्यांग बांधवांसाठी आयोजित केलेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य उपक्रम असून या माध्यमातून मोठे सहकार्य लाभेल.विविध शासकीय योजना देखील दिव्यांगासाठी आहेत,सामाजिक संघटना, शैक्षणिक संस्था यांच्या पुढाकारातून असे उपक्रम राबविण्यात मदत होते.त्यामुळे भविष्यात शासकीय योजना राबविण्यासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्थेची गरज भासेल. भविष्यात संयुक्त विद्यमाने उपक्रम राबविण्यासाठी त्यांनी इच्छा व्यक्त केली.यावेळी आमदार प्रवीण तायडे यांनी देखील विचार व्यक्त केले. तसेच रजनी अंबादे,किशोर मालोकर, रामेश्वर मणियार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ.ए.टी. देशमुख संचालन किशोर इंगळे व आभार प्रदर्शन संदीप पुंडकर यांनी केले. यावेळी पंजाबराव देशमुख अर्बन बँकेचे अध्यक्ष नरेश पाटील,आजीवन सभासद बबनराव चौधरी, डॉ.बोदडे, नरेंद्र लढ्ढा, प्रवीण रघुवंशी, भैय्यासाहेब मेटकर, पद्माकर सोमवंशी,प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख,प्राचार्य डॉ स्मिता देशमुख यांची उपस्थिती होती.

# नगरपरिषद हद्दीत ७२ केंद्रांवर मतदान, ३२ केंद्रे संवेदनशील

## अंजनगावसह चार पालिकांत सहा सदस्यपदासाठी २० डिसेंबर रोजी मतदान





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १८ अमरावती**

जिल्ह्यात अंजनगाव सुर्जी नगरपरिषद व अन्य चार पालिकांमधील सहा प्रभागात ७२ मतदान केंद्रांवर २० डिसेंबरला मतदान होत आहे. यामध्ये ३२ मतदान केंद्रे संवेदनशील आहेत. त्यामुळे तेथे अतिरिक्त बंदोबस्त तैनात असेल.

राज्य निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्यक्रमानुसार जिल्ह्यात अंजनगाव सुर्जी नगरपरिषद तसेच धारणी व अचलपूर येथे प्रत्येकी दोन सदस्य व तसेच दर्यापूर व वरुड येथे प्रत्येकी एकसदस्यपदासाठी २० डिसेंबरला ७२ केंद्रांवर मतदान होत आहे. यासाठी प्रशासनाने १५ झोनल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. यामध्ये तीन केंद्र तर कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक बाबीच्या दृष्टिकोनातून पोलिसांनी ३३ मतदान केंद्र संवेदनशील घोषित केलेले आहे. याशिवाय ६८ केंद्र परदानशीन आहेत. मतदानाच्या एक दिवसापूर्वी मतदान पथके रवाना होणार आहेत. यासाठी १५ वाहने, झोनलसाठी ११, तर सर्वेक्षण पथकासाठी ११ वाहने लागणार आहेत. पोलिस विभागाद्वारा विविध कलमान्वये प्रतिबंधात्मक ३४६ कारवाया केल्या, तर सात प्रकरणात तडीपार करण्यात आले आहे. ५४०८ समन्स तामिल झाले. तर अवैध दारूविक्रीच्या २५९ कारवाया करण्यात आल्या.

# अमरावती जिल्ह्यातील SHG महिलांचा द फ्लेवर्स ऑफ महाराष्ट्र फूड फेस्टिवल, दिल्ली येथे यशस्वी सहभाग

## दिल्लीकरांची विदर्भ स्पेशल रोडगे व आलू वांग्याच्या भाजीला प्रचंड पसंती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

नवी दिल्ली येथील निवासी आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र सदन यांच्या वतीने दिनांक १२ ते १५ डिसेंबर २०२५ या कालावधीत पलेवर्स ऑफ महाराष्ट्र या महाराष्ट्रीयन फूड फेस्टिवलचे भव्य आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राच्या समृद्ध व विविधतेने नटलेल्या पारंपरिक पाकसंस्कृतीची राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या फूड फेस्टिवलमध्ये विल्लीतील नागरिक, दिल्ली-छउठ मधील महाराष्ट्रीयन समुदाय, देश-विदेशातील राजनैतिक प्रतिनिधी, शासकीय अधिकारी तसेच मीडिया प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पर्यटनवाढीस चालना देणे व सांस्कृतिक राजनैतिक संवाद दृढ करणे, या राज्य शासनाच्या उदिशांना पूरक असा हा उपक्रम ठरला.

निवासी आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त निर्देशांनुसार अमरावती जिल्ह्याला बऱ्हाडी खाद्यपरंपरेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्वयं सहाय्यता समूहांची निवड करण्यात आली. त्यानुसार जिल्हा परिषद, अमरावतीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती संजीत महापात्र यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित झालेल्या वैदर्भी ब्रेड अंतर्गत आनंदी स्वयं सहाय्यता समूह, गाव तेलखेडा, तालुका दर्यापूर येथील ७ महिलांची टीम या राष्ट्रीयस्तरीय खाद्य महोत्सवात सहभागी झाली.या महोत्सवात राज्यातील निवडक जिल्ह्यांमधील एकूण १० स्वयं सहाय्यता समूहांनी सहभाग घेतला असून प्रत्येक समूहाकडून व्हेज व नॉन-व्हेज असे दोन स्टॉल लावण्यात आले होते. त्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील वऱ्हाडी खाद्यपदार्थांनी दिल्लीकरांचे विशेष लक्ष वेधून घेतले.अमरावती समूहामार्फत रोडगे, बिट्ट्या, मांडे, पुरणपोळी, वांगे आलू भाजी, कळीगोळे, सरगुंडे, वैदर्भी पद्धतीने तयार केलेले शेवळ्या तसेच विदर्भ स्पेशल चिकन व मटण थाळी हे पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. या पदार्थांना नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात पसंत मिळाली.

दिल्ली येथील महाराष्ट्र फूड फेस्टिवल दरम्यान मा. खासदार अमरावती लोकसभा श्री. वहवेती वानखडे, मा. खासदार वर्धा लोकसभा श्री. अमर काळे, अंतराष्ट्रीय सेलिब्रिटी प्रसिद्ध शेफ श्रीविष सदनमधील अधिकारी, महाराष्ट्रातील रहिवासी नागरिक व मीडिया प्रतिनिधींनी फूड फेस्टिवलला भेट मनहाजी यांची उपस्थिती होती तसेच इतर मान्यवर आमदार, मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी, महाराष्ट्र देऊन अमरावती येथील विदर्भी जेवणाचा आवर्जून आस्वाद घेतला.या प्रदर्शना दरम्यान दिल्लीकर नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला असून, दिनांक १२ ते १४ डिसेंबर २०२५ या तीन दिवसांच्या कालावधीत अमरावती जिल्ह्यातील स्वयं सहाय्यता समूहातील नहिलांनी २,२३,१००/- इतकी विक्रमी विक्री नोंदविली आहे

| अ.क्र. | दिनांक | व्हेज स्टाल | नॉन व्हेज स्टाल | विक्री | एकूण विक्री |
|---|---|---|---|---|---|
| १ | २.१२.२०२५ | २६५६० | ७२३० | ३३७०० | १३५६५० |
| २ | १३.१२.२०२५ | ४०१९० | २७८०० | ६७९०० | ८७६३० |
| ३ | १४.१२.२०२५ | ६८९०० | ५२६०० | १२१५०० | २,२३,१०० |

या फूड फेस्टिवलच्या माध्यमातून ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहातील महिलांना देशाच्या राजधानीत आपल्या पारंपरिक वऱ्हाडी खाद्यसंस्कृतीचे सादरीकरण करण्याची संधी मिळाली असून, जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषद, अमरावती यांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण तसेच महिलांनी तयार केलेल्या वस्तू व उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली वैदर्भी ब्रँड संकल्पना, वैदर्भी मार्ट, वैदर्भी उपहारगृह (जिल्हा परिषद परिसर) तसेच दिल्ली येथील महाराष्ट्र फूड फेस्टिवल मध्ये अमरावती जिल्ह्यातील महिलांचा सहभाग हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत असून, या माध्यमातून महिलांना उद्योजकतेस प्रोत्साहन मिळत आहे. तसेच या उपक्रमांमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने त्यांची वाटचाल अधिक भक्कम होत आहे.

# साई नगरमध्ये जिल्ह्यातील पहिल्या महिला बचत भवनाचे भूमिपूजन

## नवनित राणा यांच्या हस्ते शुभारंभ; हजारो महिलांचा उत्स्फूर्त सहभाग



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

प्रभाग क्रमांक १९ अंतर्गत साई नगर येथे जिल्ह्यातील पहिल्या महिला बचत भवनाच्या बांधकामाचे भूमिपूजन भाजपा नेत्या व माजी खासदार सौ. नवनित राणा यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला साई नगरसह परिसरातील हजारो महिलांनी उपस्थिती लावून अभूतपूर्व प्रतिसाद दिला.महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरणारे हे महिला बचत भवन परिसरातील महिला बचत गटांना एक हक्काचे व्यासपीठ देणार आहे. यामुळे महिलांच्या आर्थिक, सामाजिक तसेच शैक्षणिक उपक्रमांना चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.भूमिपूजन सोहळ्यात बोलताना सौ. नवनित राणा म्हणाल्या, महिलांनी स्वावलंबी होण्यासाठी पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. महिला बचत भवन हे त्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. महिलांचा सर्वांगीण विकास हाच खरा विकास आहे. त्यांच्या या वक्तव्याला उपस्थित महिलांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.यावेळी साई नगर प्रभागातील जनतेचे सेवक म्हणून ओळख असलेले व परिसराच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेले सचिन भेंडे यांचा विशेष उल्लेख करण्यात आला. उपस्थित महिला व नागरिकांनी येत्या महानगरपालिका निवडणुकीत सचिन भेंडे यांना आशिर्वाद देऊन निवडून आणण्याची एकमुखी विनंती केली.आपल्या भाषणात नवनित राणा यांनी, ही लढाई केवळ निवडणुकीची नसून नेत्या विरुद्ध एका सच्चा कार्यकर्त्याची आहे. नेता हवा की जनतेसाठी अहोरात्र झटणारा बेटा, हे जनतेने ठरवावे, असे स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या शेवटी महिला बचत भवनाच्या माध्यमातून साई नगरमध्ये महिलांसाठी नवे पर्व सुरू होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# नायलॉन मांजामुळे दुचाकीस्वाराचा गळा चिरला; १८ टाके लागले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८बुलढाणा**

जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील संग्रामपूर तालुक्यातील वडगाव वाण परिसरात नायलॉन मांजाने पुन्हा एकदा कहर केला! बंदी असतानाही पोलीस व प्रशासनाच्या नाकावर टिच्चून वापरल्या जाणाऱ्या नायलॉन मांजामुळे एका निष्पाप युवकाचा गळा अक्षरशः चिरला गेला असून तो युवक सध्या मृत्यूशी झुंज देत आहे. या युवकांवर अकोला येथे शस्त्रक्रिया करण्यात आली असून त्याला १८ टाके लावण्यात आले असून अजूनही त्याची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त आहे.

संग्रामपूर येथील शेख अनिस शेख गफार हा युवक आपले दैनंदिन काम आटोपून दुचाकीने घरी परतत असताना वडगाव वाण गावाजवळ अचानक रस्त्यात लटकलेल्या नायलॉन मांजाने त्याच्या गळ्यावर घाव घातला. क्षणात रक्तबंबाळ झालेल्या युवकाचा दुचाकीवरील ताबा सुटल्याने तो गंभीर जखमी झाला.

प्रारंभी त्याला गंभीर अवस्थेत गळ्याला रुमाल बांधुन ग्रामीण रुग्णालय वरवट बकाल येथे आनल्या नंतर प्राथमिक उपचार केल्यानंतर गंभीर अवस्थेत शेख अनिस मिस्त्री यांना त्यांच्या नातेवाईकांनी शासकिय रुग्णालय अकोला येथे हलविले असता शेख अनिस मिस्त्री यांच्या गळ्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आतुन व बाहेरुन १८ टाके लागले असल्याची माहिती संबंधीत रुग्णावर उपचार करणाऱ्या वैधकिय सुत्रांनी दिली

सध्या त्याला अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत